१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, गुरुवार ७ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२१, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 321, Marathi - Daily - Pune, 7 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## ५ वर्षांनी प्रथमच मोदी चीन दौऱ्यावर जाणार



**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी आगामी शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबरदरम्यान चीन दौऱ्यावर जाणार आहेत. २०२० मधील गलवान संघर्षानंतरचा हा मोदींचा पहिलाच चीन दौरा आहे. याआधी २०१८ मध्ये त्यांनी चीनला भेट दिली होती. या दौऱ्याआधी, ३० ऑगस्ट रोजी पंतप्रधान मोदी जपान दौऱ्यावर जाणार असून, तेथे भारत-जपान शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. गेल्या महिन्यात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी चीन दौरा केला. त्यावेळी त्यांनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्याशी विविध द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली होती.

# एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे दिल्लीत नेत्यांच्या भेटी! महाराष्ट्रात उत्सुकता

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज दिल्ली दौऱ्यावर होते. उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही आजपासून ३ दिवस दिल्ली दौऱ्यावर आहेत. महाराष्ट्रातील दोन्ही नेते एकाच वेळी दिल्लीत गेल्यामुळे राज्याच्या राजकारणात याविषयी अनेक अटकळी बांधल्या जात आहेत.**





■ नवी दिल्ली

**एकनाथ** शिंदे हे गेल्या आठवड्यातच दिल्ली दौऱ्यावर गेले होते. त्यानंतर काल ते पुन्हा दिल्लीला गेले. एका महिन्यातील त्यांची ही तिसरी दिल्ली भेट आहे. आज सकाळी सर्वप्रथम त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, सध्या संसदेचे अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे मी सर्व खासदारांसोबत अमित शहा यांची भेट घेतली. खासदारांचेदेखील काही विषय होते. ते या भेटीदरम्यान मी मांडले. मागील लोकसभा व विधानसभा निवडणूक महायुती म्हणून लढलो. आम्हाला या दोन्ही निवडणुकीत यश मिळाले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूकही आम्ही महायुती म्हणूनच लढवू. अमित शहा याविषयी सकारात्मक आहेत. आज आठवड्यातदेखील मी आलो होतो. त्यावेळी मी अमित शहा यांना भेटलो नव्हतो. त्यामुळे आज सदिच्छा भेट ठरली होती. केंद्रीय गृहमंत्री म्हणून अमित शहा यांनी सर्वाधिक काळ काम केले आहे. याबद्दलही मी त्यांचे अभिनंदन केले. आम्ही याबाबत खऱ्या अर्थाने सकारात्मक बैठक झाली. केंद्र आणि राज्य सरकारचे जे विकासात्मक प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांसंदर्भातदेखील या भेटीमध्ये चर्चा झाली.

ते पुढे म्हणाले की, एनडीए स्थापन होण्यापूर्वीपासून शिवसेना आणि भाजपाची युती आहे. एनडीएमधील सर्वात जुना आणि विश्वासार्ह मित्र म्हणून शिवसेनेची ओळख आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि भाजपा युतीला २५ वर्षे पूर्ण झाली. याबाबत बैठकीत चर्चा झाली. एनडीएची मंगळवारी बैठक झाली. या बैठकीला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे उपस्थित होते. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत शिवसेनेचा एनडीएला भक्कम पाठिंबा असेल.

पत्रकारांशी बोलताना त्यांनी उद्धव » पान ७ वर

# कबुतरखान्याबाबत जैन आक्रमक ताडपत्री फाडली! दाणे फेकले





**मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर मुंबई महानगर पालिकेकडून कबुतरखान्यावर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईला जैन समाजाने विरोध केला आहे. आज या विरोधातून मुंबई महापालिकेने बंद केलेल्या दादर परिसरातील कबुतरखान्याबाबत जैन समाजाने आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी कबुतरखान्याला लावलेली ताडपत्री फाडली. कबुतरांना दाणे टाकले. पोलिसांशी झटापट केली. विशेष म्हणजे, काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कबुतरखान्यावर कारवाई न करण्याचे निर्देश देऊनही जैन समाजाने हे आंदोलन करून पोलीस यंत्रणा आणि या परिसरातील रहिवासी यांना विनाकारण वेठीस धरले.**

■ मुंबई

**कबुतरखान्यावरील** कारवाईच्या बाबतीत आज जैन समाजाच्या वतीने दादरच्या जैन मंदिरात सर्वधर्मीय सभा आयोजित करण्यात आली होती. परंतु काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कबुतरखान्याबाबत निर्देश दिल्यानंतर ही सभा रद्द करण्यात आली. परंतु सकाळी १० वाजताच्या सुमारास अचानक जैन समाजाचा मोठा समूह कबुतरखान्याकडे पोहोचला. त्यांनी आक्रमक होत पालिकेने कबुतरखान्यावर टाकलेले प्लास्टिकचे आच्छादन फाडायला सुरुवात केली. महिला आंदोलकांनी हे » पान ७ वर

# राज ठाकरेंना बच्चू कडूंच्या कर्जमाफी यात्रेचे आमंत्रण

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही सविस्तर चर्चा**

■ मुंबई

**शेकापचे** नेते जयंत पाटील यांच्या पाठोपाठ आता प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनीही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली, मराठवाड्यातून निघणाऱ्या कर्जमाफी यात्रेत सहभागी होण्यासाठी मनसेला निमंत्रण देण्यात आले आहे. आम्ही अनेकदा मुंबई बंद होताना पाहिली आहे. आता एक दिवस ती शेतकऱ्यांसाठी बंद राहायला हवी, अशी मागणी यावेळी बच्चू कडूंनी राज ठाकरेंकडे केली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात राज ठाकरेंचे राजकीय लागेबांधे बदलत असल्याची चर्चा रंगली आहे.

राज ठाकरेंच्या भेटीनंतर बच्चू कडूंनी » पान ७ वर



# अमित शहांवर टिप्पणी राहुल गांधी यांना जामीन

■ रांची

**भाजपाचे** तत्कालीन अध्यक्ष अमित शहा यांच्यावर २०१८ साली केलेल्या टिप्पणी प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना, आज झारखंडमधील चाईबासा येथील विशेष आमदार खासदार न्यायालयाने जामीन मंजूर केला. न्यायालयाने राहुल गांधी यांना व्यक्तीशः उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते.

राहुल गांधी आज चाईबासा येथे येणार असल्यामुळे येथील टाटा महाविद्यालयाच्या मैदानात विशेष हेलिपॅड तयार करण्यात आले होते. राहुल गांधी न्यायालयात येण्याआधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया सुरू केली होती. सकाळी ११ वाजता राहुल गांधी न्यायालयात आले. त्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. राहुल गांधी साडेअकरा वाजता दिल्लीसाठी रवाना झाले. राहुल गांधी यांनी २८ मार्च २०१८ रोजी काँग्रेसच्या अधिवेशनात अमित शहांवर टिप्पणी केली होती. झारखंडच्या स्थानिक नेत्याने त्यांच्याविरोधात याचिका दाखल केली होती.

# आयएएस तुकाराम मुंढे यांची २० वर्षांच्या कारकिर्दीत २३ वी बदली

■ मुंबई

**शिस्तप्रिय** आणि कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या पुन्हा एकदा बदलीचे आदेश जारी केले आहेत.मुंढे यांची गेल्या २० वर्षांच्या कारकिर्दीतील ही २३ वी बदली आहे.तुकाराम मुंढे यांची असंघटीत कामगार विभागाच्या आयुक्तपदावरून बदली करण्यात आली असून ते आता राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असतील. त्यांच्यासह इतर चार अधिकाऱ्यांच्याही बदल्यात करण्यात आल्या आहेत.

प्रशासनात काम करताना



नियमांवर बोट ठेवून काम करणारे तुकाराम मुंढे हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांना पसंत नसल्याचे दिसून आले आहे. राजकीय नेतृत्वाला,मंत्र्यांना आपल्या मनाप्रमाणे नियमबाह्य गोष्टी करण्यामध्ये तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी अडथळे ठरतात.त्यामुळे नियमानुसार सर्वसाधारणपणे तीन वर्षात बदली होणे अपेक्षित असताना तुकाराम मुंढे मात्र एका विभागात सरासरी एक वर्षच काम करताना दिसून येतात. तुकाराम मुंढे हे २००५ बॅचचे अधिकारी असून गेल्या २० वर्षांच्या कालावधीत त्यांची ही २३ वी बदली ठरली आहे. प्रशासनात » पान ७ वर

# बिहारमधील वगळलेल्या मतदारांची माहिती शनिवारपर्यंत सादर करा

■ नवी दिल्ली

**बिहार** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक आयोगाने ६५ लाख मतदारांची नावे यादीतून कमी केली असून त्यावरून मोठा वादंग

**सुप्रीम कोर्टाचे आदेश**

उठला आहे. याप्रकरणी विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर आज सुनावणी झाली असता यादीतून काढून टाकलेल्या मतदारांची पूर्ण माहिती येत्या शनिवारपर्यंत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने आयोगाला दिले.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला राजकीय पक्षांबरोबरच असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्मस (एडीआर) या स्वयंसेवी संघटनेनेही आव्हान दिले आहे. त्यामुळे न्यायालयाने ६५ लाख मतदारांची माहिती राजकीय पक्षांबरोबरच एडीआरलाही द्यावेत, असे आदेश दिले आहेत. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोगाने २१ जूनपासून मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणीची (एसआयआर) मोहीम सुरू केली आहे. या विशेष सखोल फेरतपासणीमध्ये ६५ लाख मतदार बोगस असल्याचे सांगून आयोगाने ती नावे मतदार यादीतून वगळली आहेत.

# उत्तरकाशीमध्ये अडकलेले महाराष्ट्राचे ५१ पर्यटक सुखरूप! मृतांचा आकडा ५

■ उत्तरकाशी

**उत्तरकाशी** जिल्ह्यातील धाराली गावात काल खीरगंगा नदीच्या उगमस्थानी अचानक आलेल्या जलप्रलयामुळे हाहाकार माजला. या दुर्घटनेत महाराष्ट्रातील ५१ पर्यटक अडकले आहेत. ते सर्वजण सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिली. यामध्ये नांदेडचे ११, सोलापूरचे ४ आणि इतर जिल्ह्यातील ३६ पर्यटकांचा समावेश आहे. याशिवाय बचावपथकाला अजून एक मृतदेह सापडल्याने या



दुर्घटनेतील मृतांची संख्या ५ झाली आहे तर ६० पेक्षा जास्त लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे.

आतापर्यंत १९० लोकांना वाचवून त्यांना सुरक्षितस्थळी हलवले आहे.एसडीआरएफ, एनडीआरएफ, सैन्य दल आणि आयटीबीपी पथक सध्या घटनास्थळी मदतकार्य करत आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन धाराली आणि हर्षिल येथील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत. केवळ आपत्कालीन सेवा सुरू ठेवली आहे.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, धाराली गाव संपूर्णपणे बाधित झाले आहे. कालच्या घटनेनंतर अनेक टप्प्यांत » पान ७ वर


# ट्रम्प मोठी घोषणा करणार व्यापार करार चर्चा थांबली

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** भारतावर लादलेल्या आयात करामुळे दोन्ही देशांतील संबंध तणावपूर्ण बनले असतानाच त्यांच्यातील व्यापार कराराची चर्चाही थांबली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना या संदर्भात एक मोठी घोषणा करण्याची इच्छा असल्याने ही चर्चा थांबवल्याचे म्हटले जात आहे.

भारत व अमेरिका यांच्यातील व्यापार करारासंबंधात आतापर्यंत चर्चेच्या पाच फेऱ्या झाल्या आहेत. दुसऱ्या बाजूला अमेरिकेने २५ टक्के कर लावल्यानंतर तो कमी करून १५ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठीच्या वाटाघाटीही सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने म्हटले आहे की, भारत -अमेरिका यांच्यात सकारात्मक चर्चा सुरू असली तरी डोनाल्ड ट्रम्प यांचा माध्यमांमध्ये चमकायचे असल्याने ही चर्चा सध्या थांबली आहे. ट्रम्प येत्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय बाजार व विनिमय, गुंतवणूक व मोठ्या प्रमाणातील खरेदीबाबत एखादी मोठी घोषणा करण्याची शक्यता आहे. तसेच ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान युद्धात आपण मध्यस्थी केल्याचे वारंवार म्हटल्याने भारताकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

# माधुरीला नांदणीला पाठवण्यासाठी वनताराचीही सहकार्याची तयारी



■ मुंबई

**कोल्हापूर** जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील महादेवी मठातील महादेवी हत्तीणीला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर वनतारामध्ये नेण्यात आले होते. या निर्णयाला झालेल्या विरोधानंतर राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आज वनताराचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा झाली. वनताराने सकारात्मक भूमिका घेत न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.

याबाबत देवेंद्र फडणवीस एक्स पोस्ट करत म्हणाले की, महादेवी हत्तीण (माधुरी) पुन्हा सुखरुप नांदणी मठाकडे परत देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जी याचिका करण्याचे ठरविले त्यात सहभागी होण्याचा निर्णय वनताराने घेतला आहे. या चर्चेदरम्यान त्यांनी » पान ७ वर

**नांदणीत पुनर्वसन केंद्र! वनताराची तयारी**

वनताराने आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, माधुरी कोल्हापुरातच रहावी अशी इच्छा आणि आपुलकी व्यक्त करणाऱ्या भक्त, मठाचे नेते आणि लोकांच्या भावनांची पूर्ण जाणीव आणि कदर आम्ही करतो. यातील वनताराचा सहभाग मा. सर्वोच्च न्यायालय आणि मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेल्या बंधनकारक निर्देशांनुसार काटेकोर काम करण्यापुरता मर्यादित आहे. माधुरीला हलविण्याचा निर्णय न्यायालयाने त्याच्या अधिकारात घेतला होता. स्वतंत्रपणे चालवलेले एक बचाव आणि पुनर्वसन केंद्र म्हणून त्यात वनताराची भूमिका केवळ माधुरीची देखभाल करणे, तिला पशुवैद्यकीय सहाय्य पुरविणे आणि तिच्या निवासाची व्यवस्था करणे अशी होती.

माधुरीला कोल्हापूरला परत आणण्यासाठी मठ आणि महाराष्ट्र सरकार यांनी माननीय सर्वोच्च » पान ७ वर


# एकाच पदासाठी दोन नेमणुका जाहीर फडणवीस-शिंदेंमध्ये पुन्हा कोल्ड वॉर

■ मुंबई

**महायुती** सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील कोल्ड वॉर पुन्हा एकदा समोर आल्याचे चित्र आहे. राज्य शासनाने घेतलेल्या एका निर्णयामुळे दोन्ही नेत्यांमधील छुपा संघर्ष उघड झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. कारण, सरकारने बेस्ट महाव्यवस्थापकाच्या एकाच पदासाठी, एकाच दिवशी, दोन विभागांतून दोन वेगवेगळे आदेश जारी केले आहेत.

मुंबई बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्रीनिवास यांच्या निवृत्तीनंतर रिक्त झालेल्या पदावर नेमकी कोणाची नियुक्ती करावी, यावरून एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या खात्यांमध्ये चढाओढ सुरू आहे. एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास विभागाने आयएएस अधिकारी अश्विनी जोशी यांच्याकडे





बेस्टच्या महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला. विशेष म्हणजे, त्याच दिवशी देवेंद्र फडणवीस यांच्या सामान्य प्रशासन विभागाने जीएसटी आयुक्त आशिष शर्मा यांची याच पदावर नियुक्ती केली.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

कंपनीत डस्टिंग आणि जेवण बनविण्यासाठी महिला पाहिजे. संपर्क - **9820930362** {NC251714}

सुरक्षा रक्षकः १२ तास ₹ १४,०००/- माहीम, माटुंगा सेंट्रल **9137835512 / 9870002587** {NC251886}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे. सायन, माटुंगा, चेंबूर, संपर्क करा मोबाईल - **7738961909** {NC251887}

ठाणे Pokran road क्लिनिक मध्ये हाऊसकिपिंग मुले पाहिजेत. **9920480316** {NC251891}

अंधेरी आणि मस्जिद बंदरमध्ये ऑफिस बॉय मुले पाहिजेत. **7039364173** {NC251892}

प्रिंटर पाहिजेत. 04 कलर कोमोरी 20*28",02 कलर हॅडलबर्ग 20*28". **9869508665** {NC251888}

**लोअर परेल (वेस्ट) मध्ये प्रिंटिंग प्रेससाठी पेपर कटिंग मशीन ऑपरेटर (Seypa Machine) बायडिंगच्या अनुभवी पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ, ईएसआइसी सुविधा. प्रत्यक्ष भेटा - दुपारी 3 ते 7 पर्यंत. संपर्क - 9920471399, 9820064464** {NC251889}

नवीन टायर्स, युरिया, इंजिन ऑईल व बॅटरी विक्री व मार्केटिंगसाठी रिटायर्ड व्यक्ती पाहिजे. टीप :- दीर्घ मुदतीची सुट्टी मिळणार नाही (गणपती व मे महिना) भेटा - गोडाऊन-आशीर्वाद टायर सर्व्हिस, 119 - सी, रणजित स्टुडिओ, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई - 400014. मो. **9833052044/9867709545** {NCC250052}

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - **9028160157** {NC251846}

## कर्जविषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्डवर लोन मिळवा चार दिवसांत. संपर्कः **8450983443.** {NC251829}

## वर पाहिजे

सुंदर वधु 28, 5.3, 12वी, किराणा दुकानात बिलिंगच्या कामाला 12000/- कष्टाळू, निर्व्यसनी मुलगा हवा. जातीची, शिक्षणाची अट नाही. (त्वरीत विवाह) **9923490703** {NC251877}


# 'एआय'ला नियमनाची चौकट लाभेल?

एआय आता केवळ आकर्षण राहिले नसून त्याने सर्वच क्षेत्र व्यापून टाकले आहे. मात्र त्याचा सकारात्मक वापर होण्याऐवजी चुकीच्या कामासाठी अधिक वापर होताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील एका शहरात सायबर गुन्हेगाराने एका पोलिस अधिकाऱ्याचे एआयवर चित्र तयार करत त्याच्या मदतीने ज्येष्ठ नागरिकाची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. रशिया-युक्रेनचा संघर्ष असो, इस्राईल-इराण युद्ध असो या संघर्षात एआयच्या मदतीने एकमेकांवर हल्ले करण्यात आले. परिणामी 'एआय' चा वापर करण्यावरून जागतिक नियमावलीची गरज अधिक प्रकर्षाने समोर येत आहे.

**येत्या २७ ते २९ जुलै २०२५ दरम्यान टोकिओ येथे एआय (आर्टिफिशियल इंटिलिजन्स) संदर्भात तीन दिवसांचे संमेलन आयोजित केले असून यात मानवी समाजाच्या हिताच्या दृष्टीने एआयचा वापर करण्याबाबत मौलिक विचारमंथन होणार आहे.**

२०१० पासूनच पश्चिम जगात एआयचा मानवी जीवनात होणारा हस्तक्षेप पाहता धोरणकर्त्यांत द्विधा मनस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे २०१० नंतर जगभरातील सरकार, आंतरराष्ट्रीय संघटना आणि संशोधन संस्थांनी मानवकेंद्रीत एआयचा वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यासाठी सातत्याने भूमिका घेतली आणि त्यावर मंथन केले. २०१० पासून सुरू झालेल्या या चर्चेचा प्रवास हा २०२१ मध्ये युरोपीय आयोगासमोर आर्टिफिशियल इंटिलिजन्स ॲक्टचा मसुदा जाहीर करण्यापर्यंत पोचला. शेवटी एआयला मानवतेसाठी वापर, त्याची सुरक्षा, पारदर्शकता आणि जबाबदारी यासारख्या वेगवेगळ्या गोष्टींना जोडावे, असे म्हटले गेले.

अमेरिकेत २०२२ मध्ये अल्गोरिदम निश्चिती अधिनियम विधेयक काँग्रेसच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आले. यानंतर कॅनडाने आर्टिफिशियल इंटिलिजन्स आणि डेटा ॲक्टचा प्रस्ताव मांडला. यात उच्च प्रभावशाली एआय प्रणालीपासून होणाऱ्या संभाव्य धोक्याचे व्यवस्थापन करणे आणि माहिती देण्यास अनिवार्य करण्यात आले. जपानने २०२३ च्या जी-७ संमेलनात एआयसाठी मानवकेंद्रीत दृष्टीकोनातून चर्चा करण्याची अपेक्षा बाळगली. आता जपानमध्येच जुलै महिन्यात तीन दिवस एआयसंदर्भात परिषद आयोजित होत असून याचा उद्देश एआय वापराची दिशा निश्चित करणे होय.

**चर्चेतील मुद्दे**

प्रत्यक्षात जपानमधील संमेलन मानवकेंद्रीत एआय सिद्धांतांचा आढावा घेणार आहे. या परिषदेत जागतिक पातळीवरच्या एआयसंदर्भातील धोरणात्मक व्यवस्थेवर सखोलपणे विचारमंथन करण्यात येईल. या माध्यमातून मानवाची प्रतिष्ठा, तंत्रज्ञानातील वैविध्यपणा, सर्वसमावेशकता आणि पारदर्शकता हे मुद्दे प्रामुख्याने चर्चेच्या केंद्रस्थानी राहतील. युरोप, जपान, ओईसीडी तसेच जी-७ सारख्या संघटनादरम्यान विचारांचे आदानप्रदान करण्यावर भर राहिल. याप्रमाणे एआयला जागतिक रुपातून अनुकूल आणि एकीकृत दिशेने नेता येईल. हे संमेलन केवळ सिद्धांत मांडण्यापुरतेच मर्यादित राहणार नाही तर तंत्रज्ञानाच्या सुरक्षेवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. तंत्रज्ञानातून निर्माण होणारे धोके जसे दुजाभाव (बायस), अलायनमेंट, निष्कर्षाचे स्पष्टीकरण आदींवर चर्चा होणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मानवाशी असणारा संबंध आणि नैतिक मुद्याबरोबरच भविष्यातील चिंता जसे मानवी बुद्धिमता आणि संवेदनशीलतेसारख्या स्थितीवर देखील चर्चा होणार आहे. शेवटी हे संमेलन एआयच्या वापराबाबत निर्णायक दिशा देईल आणि त्याप्रमाणे वाटचाल करेल, असे म्हटले तर वावगं ठरणार नाही.




**विनिता शाह**

या संमेलनानंतर लगेचच जागतिक पातळीवर एआय वापरासंदर्भात नियमावली लागू होईल आणि नियमाच्या चौकटीतच एआयचा वापर करावा लागेल, असे घडेलच असे नाही. कदाचित नियमावलीपर्यंत ठोस निर्णय होणार नाही. परंतु एआय कोणत्या क्षेत्राला प्रोत्साहित करेल, हे मात्र निश्चित केले जाईल. उदाहरणार्थ, आरोग्य, शाश्वत विकास यांसारख्या मानवहिताच्या क्षेत्रात एआयचा कशा रितीने अधिकाधिक सकारात्मक वापर करून निकोप समाजाची निर्मिती करता येईल, याचे आकलन करण्यावर या संमेलनानंतर भर दिला जाईल. एआयच्या मदतीने शस्त्रे अधिक विनाशकारी करणे, मानवावर बारकाईने पाळत ठेवणे किंवा त्याच्याविरोधातील अमानवी प्रयोगात वापर करणे, यासारख्या गोष्टींना आळा घालण्यासाठी थातूरमातूर अटी लादून चालणार नाही. म्हणूनच स्पष्ट रुपाने नियम तयार होणे आणि कठोरपणे त्याची नैतिकतेच्या पातळीवर तपासणी केली जाणे आवश्यक आहे.

**एआय विकासाची दिशा निश्चिती**

अर्थात कोणत्या मुल्यांच्या आधारावर भविष्यात एआयचा विकास आणि वापराची दिशा ठरेल,हा खरा प्रश्न आहे. आतापर्यंतच्या संमेलनाचे स्वरुप पाहिले तर आगामी काळातही एआयमध्ये पारदर्शकता, जबाबदारी, मानवी प्रतिष्ठा, अधिकाराचा सन्मान, तंत्रज्ञानातील वैविध्यपणा, सर्वसमावेशकतेच्यां निकषावर एआयची कठोर पडताळणी होईल, असे दिसते. या मुद्यावर सर्वसमावेशक अजेंडा तयार होईल. हे संमेलन एआय तंत्रज्ञानाचा विकासाची दिशा देखील निश्चित करेल. उदा. मानवी समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा विकास करणे आणि त्या विकासाचे महत्त्वही पटवणे यावर संमेलनाचा भर राहील. या संमेलनात बायस फ्री एआय म्हणजेच पूर्वग्रहदूषित नसलेल्या एआयवर सहमती होण्याची शक्यता आहे. शेवटी एआयचे नियंत्रण हे मानवाच्याच हाती राहिल यावर शिक्कामोर्तब होणे गरजेचे आहे. जपानमधील संमलेनात विविध देश, टेक्नो कंपन्या आणि समाज यांच्यात काय खरे आणि काय चुकीचे आहे, याबाबतची स्थिती स्पष्ट करेल. परिणामी भविष्यात एआयचा अनिर्बंध वापर होणार नाही आणि तो नितिमत्ता व जबाबदारीची बांधिलकी जोपासेल. एकुणातच हे संमेलन मानवकेंद्रीत एआयचा विकास, जागतिक पातळीवरचे दिशानिर्देश, तंत्रज्ञान सुरक्षा आणि एआयसंदर्भातील दीर्घकालीन भूमिका विकसित करण्यास हातभार लावेल. यासाठी कायदा तयार केला नाही तरी धोरण, प्राधान्यक्रम आणि नैतिकेची दिशा निश्चित केली जाईल, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. यात निधी आणि नवोन्मेष यांच्यात ताळमेळ बसविला जाईल. या संमेलनाच्या माध्यमातून जपानला एआयसंदर्भात जागतिक भूमिकेत मध्यवर्ती भूमिका पार पाडण्याची संधी मिळणार आहे. त्याचवेळी या संमेलनात स्वतंत्र संशोधन संस्था अणि मल्टी स्टेकहोल्डराची भूमिका देखील स्पष्ट होईल. याचाच अर्थ हे संमेलन केवळ सरकार किंवा तंत्रज्ञान तज्ज्ञांपुरतीच मर्यादित राहणार नाही तर उद्योगजगक, शिक्षण क्षेत्र, नागरिक समाजाचे प्रतिनिधीही संमेलनाच्या माध्यमातून महत्त्वाची भूमिका बजावतील.



# आजचे राशी भविष्य

गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | धार्मिक यात्रा करण्याचे योजाल. आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ द्याल. मित्रमंडळींचे सहकार्य मिळेल. |
| वृषभ | पैशासंबंधीचे व्यवहार लांबू शकतात. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. आर्थिक लाभात चढउतार राहील. |
| मिथुन | वडिलोपार्जित व्यवसायात यशप्राप्ती चांगली होईल. नवीन गुंतवणूक करण्याचे मनात येईल. घरात उत्साहाचे वातावरण राहील. |
| कर्क | आर्थिक व्यवहार सुरळीत पार पडतील. नवीन करारमदार होऊ शकतात. नोकरीनिमित्त दूरदेशी जाण्याचे योग. |
| सिंह | सरकारी क्षेत्रात काम करणाऱ्यांना अनुकूलता राहील. तुमच्या बोलण्याने जोडीदार दुखावला जाणार नाही याची काळजी घ्या. आर्थिक लाभ चांगले होतील. |
| कन्या | व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल करण्याचे योजाल. सहकारी वर्गाची साथ लाभेल. घरसजावटीवर खर्च कराल. |
| तूळ | धार्मिक यात्रा करण्याचे मनात येईल. व्यवसायामध्ये वडीलधाऱ्या मंडळींचा सल्ला उपयोगी ठरेल. नोकरीमध्ये जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| वृश्चिक | कमिशन व्यवसायिकांना चांगले दिवस येतील. नोकरीसाठी अधिक मेहनत घ्यावी लागेल. जोडीदाराच्या आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. |
| धनु | नोकरीमध्ये अधिकारप्राप्तीचे योग येतील. सामाजिक क्षेत्रात मैत्री वाढेल. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. |
| मकर | व्यवसायानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. संततीबाबत शुभ घटना घडतील. आर्थिक गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी. |
| कुंभ | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. तुम्ही केलेल्या योजना सफल होतील. मित्रपरिवारात रमाल. |
| मीन | तुमच्यातील कलागुणांचे कौतुक होईल. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. नवीन प्रकल्प सुरू करण्यासाठी चांगला दिवस. |


**CHANGE OF NAME**

I **SUSHANT RAMCHANDRA DHADAVE** Residing at Po-Umaroli, Tal. Mandangad, Ratnagiri, Pin : 415208, Maharashtra India. My name has been changed to **SUSHANT RAMCHANDRA DHADVE** as per affidavit dated 5th August 2025.

**SUSHANT RAMCHANDRA DHADAVE**

(Signature by old name)


# नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्राधिकरण स्थापन करणार

■ मुंबई

**राज्यातील** नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण

**फडणवीसांकडून मंजुरी**

विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीला पर्यावरण आणि हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे तसेच सल्लागार संस्थेच्या नमिता रेपे उपस्थित होत्या.

प्राधिकरणाच्या रचना व संकल्पनेचे पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी विस्तृत सादरीकरण केले. नदी पुनरुज्जीवनासाठी डीपीआर व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये प्राधिकरणाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# एसआयआरवरून गदारोळ राज्यसभा कामकाज तहकूब

■ नवी दिल्ली

बिहारमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (एसआयआर) नावाखाली मतांची चोरी केली जात असल्याचा गंभीर आरोप इंडिया आघाडीने केंद्र सरकारवर केला. यासंदर्भात विरोधी खासदारांनी संसदेच्या बाहेर घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी खा.प्रियांका गांधी,खा.मल्लिकार्जुन खर्गे,खा. सुप्रिया सुळे,खा.संजय राऊत इत्यादी सहभागी झाले होते.याशिवाय याच मुद्द्यावरून राज्यसभेत गदारोळ झाला. त्यानंतर संसदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले .यावेळी विरोधकांनी आरोप केले की, मोदी सरकार आणि निवडणूक आयोग या षडयंत्रात एकत्रित सहभागी आहेत.

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-00 : 0717**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1780 | 1957 | 2532 | 3235 | 4955 | 5223 | 5277 | 5485 | 5571 | 9610 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0237 | 2562 | 4711 | 5245 | 5564 | 5829 | 6024 | 7058 | 7115 | 7413 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1739 | 1883 | 2435 | 2856 | 4450 | 5217 | 5754 | 6892 | 7343 | 8618 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0899 | 1838 | 2777 | 3623 | 4842 | 5835 | 6546 | 7350 | 8158 | 9140 |
| 0006 | 0925 | 1881 | 2901 | 3628 | 4874 | 5849 | 6556 | 7364 | 8214 | 9173 |
| 0009 | 1092 | 2132 | 2938 | 3680 | 5054 | 5871 | 6584 | 7483 | 8428 | 9193 |
| 0107 | 1103 | 2142 | 2972 | 3775 | 5145 | 5905 | 6622 | 7607 | 8468 | 9263 |
| 0126 | 1110 | 2192 | 3051 | 3807 | 5156 | 5945 | 6628 | 7683 | 8483 | 9296 |
| 0149 | 1116 | 2218 | 3132 | 3952 | 5350 | 5963 | 6642 | 7706 | 8506 | 9347 |
| 0166 | 1141 | 2247 | 3199 | 3990 | 5358 | 6012 | 6651 | 7716 | 8583 | 9359 |
| 0205 | 1142 | 2265 | 3225 | 4044 | 5365 | 6051 | 6653 | 7719 | 8686 | 9374 |
| 0215 | 1172 | 2280 | 3237 | 4048 | 5371 | 6113 | 6684 | 7721 | 8780 | 9425 |
| 0224 | 1300 | 2291 | 3336 | 4425 | 5418 | 6156 | 6786 | 7741 | 8782 | 9577 |
| 0238 | 1312 | 2322 | 3337 | 4448 | 5451 | 6165 | 6828 | 7749 | 8796 | 9599 |
| 0274 | 1317 | 2421 | 3348 | 4480 | 5470 | 6186 | 6862 | 7770 | 8811 | 9613 |
| 0284 | 1360 | 2442 | 3354 | 4494 | 5525 | 6247 | 6889 | 7772 | 8843 | 9759 |
| 0310 | 1448 | 2532 | 3371 | 4556 | 5531 | 6302 | 6959 | 7798 | 8857 | 9768 |
| 0380 | 1484 | 2542 | 3374 | 4596 | 5552 | 6307 | 6991 | 7877 | 8870 | 9823 |
| 0405 | 1555 | 2543 | 3388 | 4678 | 5594 | 6337 | 7026 | 7887 | 8884 | 9836 |
| 0455 | 1576 | 2556 | 3392 | 4683 | 5620 | 6344 | 7056 | 7976 | 8913 | 9874 |
| 0665 | 1641 | 2604 | 3433 | 4693 | 5654 | 6412 | 7077 | 7994 | 8958 | 9890 |
| 0683 | 1712 | 2608 | 3493 | 4708 | 5678 | 6416 | 7190 | 8032 | 9050 | 9896 |
| 0696 | 1751 | 2638 | 3536 | 4714 | 5772 | 6451 | 7235 | 8080 | 9101 | 9949 |
| 0798 | 1758 | 2762 | 3537 | 4744 | 5806 | 6476 | 7301 | 8096 | 9114 | 9960 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ७/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | २ | ७ |
| ३२ | २३ | ७३ |
| ३७ | २८ | ७८ |
| १३९ | १३८ | १३३ |
| ४९० | ३४५ | ४६७ |

## लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत दर बुधवारी — तिकीट किमत रु. 50/- — सोडत क्र. 32 — सोडत दिनांक 06/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख — **AK-05 : 5791**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2617** — गजानन लॉटरी सेंटर - बुलडाणा

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1854 | 2763 | 2983 | 4755 | 6012 | 7345 | 7885 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1096 | 3538 | 4445 | 4525 | 6535 | 7639 | 7686 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1522 | 1567 | 1905 | 3007 | 4093 | 4405 | 7746 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1263 | 1521 | 2780 | 4666 | 4823 | 7447 | 7855 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2044 | 2404 | 2884 | 3340 | 3936 | 4424 | 4994 | 5525 | 6021 | 6520 | 6936 | 7535 |
| | | 2045 | 2405 | 2892 | 3343 | 3938 | 4425 | 5085 | 5557 | 6036 | 6538 | 6966 | 7565 |
| | | 2052 | 2429 | 2918 | 3372 | 3955 | 4430 | 5095 | 5576 | 6038 | 6578 | 6967 | 7567 |
| 1013 | 1481 | 2062 | 2436 | 2922 | 3377 | 3966 | 4450 | 5105 | 5577 | 6050 | 6580 | 6969 | 7569 |
| 1026 | 1483 | 2064 | 2448 | 2925 | 3387 | 3984 | 4462 | 5120 | 5578 | 6060 | 6586 | 6971 | 7593 |
| 1027 | 1484 | 2084 | 2514 | 2932 | 3390 | 3986 | 4466 | 5129 | 5597 | 6061 | 6596 | 6983 | 7635 |
| 1046 | 1511 | 2086 | 2522 | 2946 | 3391 | 3988 | 4468 | 5135 | 5601 | 6069 | 6606 | 6986 | 7667 |
| 1081 | 1518 | 2096 | 2532 | 2957 | 3393 | 3990 | 4474 | 5142 | 5602 | 6082 | 6630 | 7022 | 7682 |
| 1091 | 1531 | 2115 | 2565 | 2978 | 3419 | 4004 | 4479 | 5166 | 5608 | 6105 | 6639 | 7055 | 7684 |
| 1095 | 1560 | 2125 | 2583 | 2982 | 3423 | 4007 | 4480 | 5175 | 5625 | 6117 | 6655 | 7073 | 7687 |
| 1098 | 1573 | 2132 | 2605 | 3026 | 3439 | 4047 | 4481 | 5185 | 5628 | 6126 | 6659 | 7087 | 7714 |
| 1101 | 1612 | 2138 | 2625 | 3040 | 3459 | 4048 | 4530 | 5189 | 5652 | 6156 | 6665 | 7091 | 7749 |
| 1109 | 1618 | 2181 | 2639 | 3041 | 3493 | 4049 | 4535 | 5245 | 5697 | 6159 | 6680 | 7097 | 7750 |
| 1110 | 1631 | 2182 | 2640 | 3045 | 3539 | 4060 | 4561 | 5250 | 5710 | 6163 | 6683 | 7113 | 7754 |
| 1111 | 1654 | 2188 | 2650 | 3047 | 3547 | 4062 | 4587 | 5257 | 5728 | 6166 | 6687 | 7161 | 7755 |
| 1113 | 1673 | 2200 | 2661 | 3073 | 3565 | 4068 | 4601 | 5286 | 5754 | 6177 | 6728 | 7171 | 7757 |
| 1114 | 1698 | 2204 | 2678 | 3082 | 3572 | 4088 | 4625 | 5301 | 5785 | 6183 | 6740 | 7219 | 7762 |
| 1153 | 1710 | 2222 | 2688 | 3093 | 3576 | 4104 | 4641 | 5307 | 5793 | 6192 | 6746 | 7230 | 7767 |
| 1158 | 1711 | 2229 | 2708 | 3102 | 3577 | 4133 | 4660 | 5311 | 5801 | 6205 | 6749 | 7236 | 7774 |
| 1164 | 1716 | 2246 | 2726 | 3103 | 3606 | 4140 | 4673 | 5318 | 5805 | 6206 | 6772 | 7271 | 7779 |
| 1167 | 1765 | 2251 | 2728 | 3111 | 3610 | 4164 | 4764 | 5319 | 5836 | 6244 | 6780 | 7287 | 7795 |
| 1196 | 1798 | 2255 | 2738 | 3136 | 3625 | 4181 | 4778 | 5322 | 5842 | 6258 | 6810 | 7293 | 7797 |
| 1213 | 1807 | 2270 | 2744 | 3143 | 3635 | 4182 | 4824 | 5355 | 5856 | 6306 | 6819 | 7297 | 7798 |
| 1247 | 1808 | 2284 | 2752 | 3154 | 3649 | 4194 | 4837 | 5358 | 5875 | 6315 | 6821 | 7307 | 7799 |
| 1265 | 1809 | 2288 | 2756 | 3180 | 3708 | 4224 | 4841 | 5368 | 5885 | 6326 | 6828 | 7327 | 7822 |
| 1284 | 1817 | 2293 | 2759 | 3183 | 3711 | 4314 | 4842 | 5390 | 5894 | 6336 | 6830 | 7330 | 7837 |
| 1286 | 1836 | 2302 | 2762 | 3203 | 3732 | 4324 | 4845 | 5397 | 5896 | 6363 | 6836 | 7333 | 7839 |
| 1296 | 1851 | 2312 | 2763 | 3208 | 3757 | 4331 | 4884 | 5449 | 5897 | 6379 | 6848 | 7337 | 7867 |
| 1301 | 1861 | 2313 | 2772 | 3224 | 3762 | 4334 | 4886 | 5451 | 5909 | 6388 | 6849 | 7352 | 7873 |
| 1314 | 1880 | 2322 | 2795 | 3239 | 3763 | 4343 | 4889 | 5476 | 5924 | 6396 | 6863 | 7373 | 7876 |
| 1340 | 1891 | 2324 | 2800 | 3243 | 3769 | 4348 | 4893 | 5480 | 5935 | 6404 | 6868 | 7387 | 7885 |
| 1359 | 1910 | 2328 | 2804 | 3247 | 3794 | 4361 | 4898 | 5485 | 5950 | 6408 | 6880 | 7401 | 7916 |
| 1391 | 1918 | 2329 | 2810 | 3269 | 3801 | 4394 | 4904 | 5491 | 5952 | 6412 | 6882 | 7425 | 7968 |
| 1401 | 1954 | 2332 | 2814 | 3283 | 3810 | 4405 | 4938 | 5497 | 5964 | 6417 | 6887 | 7459 | 7971 |
| 1407 | 2000 | 2345 | 2816 | 3284 | 3832 | 4406 | 4943 | 5505 | 5970 | 6426 | 6889 | 7470 | 7974 |
| 1425 | 2017 | 2351 | 2820 | 3317 | 3837 | 4412 | 4946 | 5509 | 5985 | 6462 | 6912 | 7476 | 7980 |
| 1427 | 2022 | 2352 | 2821 | 3327 | 3839 | 4414 | 4947 | 5517 | 5989 | 6486 | 6916 | 7479 | 7981 |
| 1451 | 2030 | 2402 | 2839 | 3335 | 3873 | 4419 | 4980 | 5521 | 5999 | 6493 | 6926 | 7486 | 7987 |
| 1465 | 2037 | 2403 | 2847 | 3336 | 3925 | 4420 | 4987 | 5524 | 6006 | 6515 | 6930 | 7508 | 7988 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-04 : 7803**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- — 0154 | 4033 (मातोश्री एन्टरप्रायझेस, खामगाव) | 6917 | 7235 | 7889

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0722 | 1288 | 1483 | 2012 | 2407 | 2661 | 4040 | 5642 | 5918 | 9625 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1778 | 3026 | 3284 | 4185 | 4956 | 7357 | 7685 | 7733 | 8296 | 9148 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0006 | 1482 | 2250 | 3345 | 4141 | 5415 | 6398 | 7444 | 7925 | 9259 |
| 0010 | 1561 | 2258 | 3361 | 4466 | 5457 | 6445 | 7445 | 7973 | 9295 |
| 0204 | 1715 | 2273 | 3392 | 4494 | 5551 | 6503 | 7470 | 8140 | 9297 |
| 0300 | 1786 | 2438 | 3574 | 4532 | 5587 | 6628 | 7492 | 8204 | 9386 |
| 0365 | 1808 | 2566 | 3636 | 4695 | 5750 | 6662 | 7507 | 8236 | 9440 |
| 0410 | 1863 | 2652 | 3754 | 4904 | 5843 | 6682 | 7675 | 8371 | 9461 |
| 0721 | 1878 | 2698 | 3767 | 4920 | 5866 | 6683 | 7680 | 8666 | 9509 |
| 1131 | 1953 | 2825 | 3773 | 5092 | 5951 | 6706 | 7731 | 8804 | 9585 |
| 1152 | 2020 | 2826 | 3873 | 5175 | 6089 | 6718 | 7770 | 8818 | 9660 |
| 1169 | 2032 | 2846 | 3890 | 5278 | 6127 | 6768 | 7784 | 8837 | 9691 |
| 1230 | 2141 | 2904 | 4047 | 5288 | 6165 | 6826 | 7789 | 8895 | 9848 |
| 1315 | 2159 | 2914 | 4054 | 5325 | 6215 | 7114 | 7790 | 8898 | 9929 |
| 1391 | 2236 | 2993 | 4069 | 5344 | 6253 | 7347 | 7807 | 8988 | 9952 |
| 1478 | 2237 | 3199 | 4093 | 5375 | 6362 | 7427 | 7916 | 9109 | 9989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SV-00 : 1583**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 2055 | 2363 | 2853 | 3233 | 3275 | 3869 | 3918 | 4392 | 5445 | 5733 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1535 | 1830 | 1865 | 3326 | 3614 | 3817 | 4306 | 4334 | 4820 | 4844 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1016 | 1935 | 3157 | 4026 | 5257 |
| 1176 | 2006 | 3227 | 4121 | 5329 |
| 1189 | 2092 | 3300 | 4229 | 5336 |
| 1602 | 2182 | 3329 | 4344 | 5458 |
| 1670 | 2222 | 3357 | 4432 | 5579 |
| 1718 | 2241 | 3362 | 4456 | 5594 |
| 1732 | 2282 | 3395 | 4465 | 5655 |
| 1846 | 2494 | 3437 | 4661 | 5665 |
| 1860 | 2602 | 3524 | 4772 | 5752 |
| 1871 | 2688 | 3642 | 5000 | 5818 |
| 1875 | 2722 | 3766 | 5004 | 5922 |
| 1911 | 2896 | 3942 | 5243 | 5954 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

देश विदेश

# 'डीआरडीओ'च्या गेस्ट हाऊसच्या मॅनेजरला हेरगिरीप्रकरणी अटक

■ जैसलमेर

**देशाच्या** सुरक्षेशी संबंधित अत्यंत संवेदनशील संस्था असलेल्या डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेच्या एका गेस्ट हाऊसच्या व्यवस्थापकाला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून अटक केली आहे.महेंद्र प्रसाद असे या अटक केलेल्या व्यवस्थापकाचे नाव असून त्याला सुरक्षा यंत्रणांनी जैसलमेर येथील पोखरण फील्ड फायरिंग रेंजमधून अटक केली.

महेंद्र प्रसाद हा २०१८ पासून पोखरण फील्ड फायरिंग रेंजच्या डीआरडीओ गेस्ट हाऊसमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करत आहे. याच गेस्ट हाऊसमध्ये लष्करी चाचण्या आणि संशोधनाशी संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि शास्त्रज्ञ मुक्काम करतात. हे गेस्ट हाऊस धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील भागात आहे. याठिकाणी नवीन शस्त्रास्त्रांच्या चाचणी, सामरिक सराव आणि युद्ध सरावांशी संबंधित उपक्रमही राबवले जातात. महेंद्र प्रसाद हा या महत्त्वाच्या कारवायांशी संबंधित माहिती मोबाईल फोनद्वारे पाकिस्तानला पुरवित होता. त्याच्या मोबाईल आणि चॅटसमधून हेरगिरीचे महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. महेंद्र प्रसादच्या मोबाईलवर पाकिस्तानमधून वारंवार कॉल येत असल्याचे भक्कम पुरावे सापडले आहेत. त्याच्या मोबाईलमधून पाकिस्तानशी संबंधित आणखी काही महत्वाची माहिती हाती लागण्याची शक्यता आहे. जैसलमेरचे एसपी अभिषेक शिवहरे यांनी सांगितले की, महेंद्र प्रसादला संयुक्त चौकशी समितीकडे सोपवले जाईल. ही समिती लष्करी गुप्तचर, गुप्तचर ब्युरो आणि इतर केंद्रीय संस्थांच्या अधिकाऱ्यांची बनलेली आहे, जी सुरक्षेशी संबंधित बाबींचा सखोल तपास करते.

## महापालिका प्रशासनाने मागविल्या पुन्हा निविदा

# भागीदार निवडण्याचा अधिकार सर्व देशांना

**रशियाची प्रतिक्रिया**

■ मॉस्को

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेले वाढीव आयात शुल्क आणि रशियाशी व्यापारी संबंध ठेवल्याने दंड आकारण्याच्या दिलेल्या धमकीवर रशियाच्या वतीने आज पहिल्यांदाच अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आली. ट्रम्प यांचे यासंबंधातील वक्तव्य आणि ते वापरत असलेले दबाव तंत्र हे कायद्याला धरून नाही,असे रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी म्हटले आहे.

आपल्या देशाच्या हितासाठी व्यावसायिक भागीदार निवडण्याचा अधिकार सर्व सार्वभौम राष्ट्रांना असला पाहिजे आणि तो तसा आहे,असे आमचे मत आहे. प्रत्येक देशाला आपल्या आर्थिक विकासात कोणाला भागीदार करून घ्यावे हे ठरवण्याचा अधिकार आहे. देशहिताच्या रक्षणासाठी ते आवश्यक आहे, असे पेस्कोव्ह पुढे म्हणाले.

ट्रम्प यांनी ३१ जुलै रोजी आपल्या ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत भारतावर २५ टक्के आयात शुल्क आणि रशियाबरोबर व्यापार करण्यामुळे दंड आकारण्याची घोषणा केली.त्यानंतर आज रशियाच्या वतीने ही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आली.

# बांगलादेशात पुढच्या वर्षी ७ फेब्रुवारीला निवडणूक

■ ढाका

**बांगलादेशात** शेख हसीना यांचे सरकार खाली खेचल्यानंतर तिथे अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले होते. तेव्हापासून सुरू असलेली सार्वत्रिक निवडणुकांची मागणी अखेर मान्य झाली असून पुढच्या वर्षी ७ फेब्रुवारीला सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद यूनुस यांनी ही घोषणा केली. गेल्या वर्षी झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पहिल्या वर्धापन दिनी मोहम्मद यूनुस यांनी म्हटले की, मी सरकारच्या वतीने निवडणूक आयोगाला पत्र लिहून पुढच्या वर्षीच्या रमजानच्या आधी निवडणुका घ्यायला सांगणार आहे. त्यानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका होणार असून त्यानंतर लोकनियुक्त सरकार सत्तेवर येणार आहे. निवडणुकांसाठी मे महिन्यात एक भव्य मोर्चाही काढण्यात आला होता. बांगलादेशातील अनेक पक्षांनीही निवडणुकीसाठी दबाव टाकला होता.

# देशाची जीडीपी वाढ ६.५ टक्के गव्हर्नर मल्होत्रा यांचा अंदाज



■ नवी दिल्ली

**देशाची** चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी जीडीपी दरवाढ ६.५ टक्के राहणार आहे, असा अंदाज आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज पतधोरण समितीच्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की,चालू आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६.५ टक्के असेल,दुसऱ्या तिमाहीत ६.७ टक्के,तिसऱ्या तिमाहीत ६.६ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ६.३ टक्के राहणार असल्याचा अंदाज आहे. तर २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६.६ टक्के राहील.या अंदाजानुसार अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेचे प्रमाण नियंत्रणात राहून जोखीम संतुलित राहण्याची शक्यता आहे. आरबीआय पतधोरण समितीने रेपो दराबाबत तटस्थ भूमिका घेतली आहे. त्यानुसार रेपो दर ५.५ टक्क्यांवर स्थिर ठेवला आहे. महागाई दराचा अंदाज ३.७ टक्क्यांवरून कमी करून ३.१ टक्के केला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत महागाई लक्षणीयरीत्या कमी होण्याची शक्यता आहे. उद्योग क्षेत्रातील वाढ अजूनही मर्यादित आहे.

# हैदराबादमध्ये गॅस सिलिंडर स्फोटात एकाचा मृत्यू

■ हैदराबाद

**तेलंगणातील** हैदराबादमध्ये घरगुती गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या स्फोटामुळे संपूर्ण घर कोसळले. शिवाय एकाचा मृत्यू झाला तर, एकजण गंभीर जखमी असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. हैदराबादमधील मेडचल भागात घडलेली ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून तिचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. मुरली यांच्या घरात हा गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. हा स्फोट झाला तेव्हा घरात दोन व्यक्ती होत्या. त्या घरातच अडकल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच बचाव पथक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घरात अडकलेल्या दोन्ही व्यक्तींना बाहेर काढले आणि रुग्णालयात दाखल केले.

# चीनच्या गेगाँगमध्ये चिकनगुनियाचे सात हजार रुग्ण आढळले

■ बीजिंग

**चीनच्या** गेंगाँग भागात चिकनगुनियाचे सात हजार रुग्ण आढळले आहेत. मच्छरांमुळे ही साथ पसरली असून त्याचा कोविडप्रमाणे मुकाबला करण्यात येत आहे.



सध्या या भागातील अनेक रुग्णालयांमध्ये चिकनगुनियाचे रुग्ण उपचार घेत असून त्यांची चाचणी नकारात्मक आल्यानंतरच त्यांना रुग्णालयातून घरी सोडले जात आहे. गेंगाँग भागातील फोशानसह इतर १२ शहरांमध्ये चिकनगुनियाचा प्रादुर्भाव वाढला असून गेल्या आठवड्यात तीन हजारहून अधिक रुग्ण आढळले आहेत. हा साथीचा आजार नसून तो केवळ मच्छरांच्या चावण्यातून होत असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. या भागात सध्या रोगाने भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. यामुळे प्रशासनाकडून मोठी तयारी करण्यात आली असून घरांच्या व सार्वजनिक जागी मच्छरांची वाढ होऊ नये म्हणून उपाययोजना केल्या जात आहेत. ज्यांना ताप, सांधेदुखी व शरीरावर चट्टे उठले असतील त्यांनी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता मराठी भाषेचा अभिनव उपक्रम

■ मुंबई

**बृहन्मुंबई** वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त जीवन भोसले यांच्या संकल्पनेतून साकारलेला एक अभिनव उपक्रम नुकताच लोअर परळ येथील एका वृत्तपत्र स्टॉलवर आयोजित करण्यात आला होता.



या उपक्रमाचे अनावरण सकाळी ११ वाजता समाजसेवक डॉ.निलेश मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.या उपक्रमामध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि तरुण व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने लोअर परळ येथील वृत्तपत्र स्टॉलवर मराठी वाचूया, मराठी बोलूया, मराठी अभिजात जपूया! अशा प्रेरणादायी घोषवाक्यांनी सजलेली छत्री उभारण्यात आली आहे.

यावेळी बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे कार्याध्यक्ष मधुसुदन सदडेकर, सरचिटणीस संजय चौकेकर, खजिनदार रवींद्र चिले, सल्लागार अजित सहस्त्रबुद्धे, ठाणे वृत्तपत्र संघाचे सरचिटणीस संतोष विचारे आणि उद्योजक रत्नाकर चंदन आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.

# शिक्षकाला बंदूक दारववत माजी नगरसेवकाची धमकी

■ नाशिक

**नाशिक** शहरात किरकोळ वादातून भाजपाच्या माजी नगरसेवकाने शिक्षकाला बंदूक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार झाला. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात संबंधित माजी नगरसेवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथर्डी फाटा परिसरात गाडीला कट मारण्याच्या कारणावरून शिक्षक आणि माजी नगरसेवक यशवंत निकुळे यांच्यात वाद झाला. त्यावेळी निकुळे यांनी शिक्षकाला बंदूक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अकोल्यात सासरच्या छळाला कंटाळून तरुणाची आत्महत्या

■ अकोला

**अकोल्यात** आंतरजातीय विवाह केलेल्या तरुणाने सासरच्या मंडळींच्या छळाला कंटाळून रेल्वेखाली उडी घेत आत्महत्या केली. संघपाल खंडारे असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याने मृत्यूपूर्वी बनवलेल्या व्हिडिओमध्ये पत्नी आणि सासरच्या मंडळींनी मारहाण आणि मानसिक छळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे. दादा, हा व्हिडिओ पोलिसांना दाखव, अशी विनंती त्याने या व्हिडिओत केली आहे. त्याचा हा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

संघपाल अकोला जिल्ह्यातील अकोट फाईल पोलीस स्थानकाच्या हद्दीतील शंकरनगर येथील रहिवासी आहे. त्याने ७ वर्षांपूर्वी शबनम फातिमा या तरुणीशी आंतरजातीय

## व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल

विवाह केला होता. त्यांना एक सहा वर्षांची मुलगी आहे. सुरुवातीला सर्व काही सुरळीत होते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात कौटुंबिक कलह सुरू होता. सोमवारी रात्री पती-पत्नीत झालेल्या वादानंतर संघपालने आत्महत्या करण्याचे ठरवले. त्यानुसार त्याने मृत्यूपूर्वी एक व्हिडिओ रेकॉर्ड केला. हा व्हिडिओ त्याने आपल्या मोठ्या भावाला पाठवला. यात त्याने म्हटले आहे की, माझ्या मृत्यूला माझी पत्नी शबनम फातिमा, तिची आई, भाऊ आणि इतर नातेवाईक जबाबदार आहेत. या लोकांनी मला पायल इलेक्ट्रॉनिक्सजवळ बेदम मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. याचे पुरावे सीसीटीव्ही फुटेजमध्ये मिळतील. मी काही दिवसांपूर्वी पत्नीच्या आग्रहावरून तीन लाखांचे कर्ज काढले आहे. सासरच्या लोकांकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला आणि जीविताच्या धोक्याला कंटाळून मी आत्महत्या करत आहे.

# नाशिकमध्ये १५ ऑगस्टपर्यंत शस्त्रबंदी आणि जमावबंदी लागू

■ नाशिक

**नाशिकमध्ये** प्रशासनाने १५ ऑगस्ट २०२५ च्या रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्रबंदी आणि जमावबंदी लागू केली आहे. अपर जिल्हादंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी हा आदेश जारी केला असून शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून ही खबरदारी घेण्यात आली आहे.

या आदेशानुसार, कोणीही शस्त्र, स्फोटके, तलवारी, बंदुका, पिस्तूल किंवा अन्य शस्त्र घेऊन फिरू शकणार नाही. पाच किंवा त्यापेक्षा अधिक लोकांचा जमाव सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यास मज्जाव केला आहे. लग्न, आठवडे बाजार, धार्मिक मिरवणुका यांना सवलत असणार आहे. अधिकृत परवानगी घेतलेल्या सभा, मिरवणुकांनाही सूट देण्यात येणार आहे. पोलीस व शासकीय कर्मचाऱ्यांवर आदेशाची अट लागू होणार नाही. नाशिकच्या नागरिकांनी प्रशासनाच्या या आदेशाचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

# शेतातील विद्युत तारेला स्पर्श! शेतकऱ्याचा मृत्यू

■ धाराशिव

**धाराशिवच्या** लोहारा तालुक्यातील जेवळी गावात शेताभोवती लावलेल्या विद्युत तारेच्या कुंपणाला स्पर्श झाल्याने एका शेतकरी युवकाचा मृत्यू झाला. गुणवंत बलभीम कागे (३२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. उस पिकाचे डुकरापासून संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्याने ऊस लागवड केलेल्या शेताच्या बांधावर तारेचे कुंपण घातले होते. तसेच या तारांमध्ये विद्युत प्रवाहदेखील सोडला होता. या तारेला गुणवंतचा स्पर्श होताच तो जागीच कोसळला. या घटनेची माहिती गावात कळताच ग्रामस्थांनी शेताकडे धाव घेत गुणवंतला रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# पुणे-नागपूर-पुणे वंदे भारतला मंजुरी

■ पुणे

**पुणे-नागपूर-पुणे** वंदे भारत एक्स्प्रेसला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. पुढील महिनाभरात ही सेवा सुरू होणार असून तयारीला सुरुवात झाली आहे. या गाडीमुळे



प्रवासाचा कालावधी दीड ते दोन तासांनी कमी होणार आहे. रेल्वे बोर्डाचे प्रधान सचिव सतीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रकल्पांतर्गत वंदे भारत एक्स्प्रेस आणि अमृत भारत एक्स्प्रेस तसेच या योजनेतील स्थानकांच्या पुनर्बांधणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे- नागपूर-पुणे या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली.

सध्या पुण्यातून तीन मार्गांवर वंदे भारत गाड्या चालतात. नागपूरमार्गे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने ही गाडी उपयुक्त ठरणार आहे. पुणे-नागपूर अंतर सुमारे ९०० किमी असून, हे अंतर आता नऊ ते साडेनऊ तासांत पार करता येणार आहे. गाडीचे थांबे दौंड, अहिल्यानगर, कोपरगांव, मनमाड, जळगाव, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, अजनी (नागपूर) येथे प्रस्तावित आहेत.

# सहावीतील मुलीचा हृदयविकाराने मृत्यू

■ नाशिक

**नाशिक** - शहरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या इयत्ता सहावीतील मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. श्रेया किरण कापडी असे मृत मुलीचे नाव आहे. आज सकाळच्या सुमारास शाळेच्या प्रवेशद्वारामधून आत प्रवेश करताना श्रेयाला अचानक चक्कर आल्याने ती खाली कोसळली. शिक्षकांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी शिपायांच्या मदतीने तिला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु डॉक्टरांनी हृदयविकाराच्या झटक्याने तिचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

# महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपी गोट्या गित्तेवर ४३ गुन्हे



■ बीड

**परळीतील** व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणातील संशयित आरोपी गोट्या उर्फ ज्ञानोबा गित्ते हा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. विशेष म्हणजे, गोट्या गित्तेवर दरोडा, हत्येचा प्रयत्न, चोरी, अपहरण, खंडणी, सरकारी कामात अडथळा यांसारख्या एकूण ४३ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्याने काही दिवसांपूर्वीच स्वतःचा व्हिडिओ जारी केला होता. तरी पोलिसांना तो सापडलेला नाही.

गोट्या गित्ते हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याचा कट्टर समर्थक आहे. गोट्या गित्तेच्या विरोधामध्ये बीड जिल्ह्यात परळी, अंबाजोगाई तालुक्यात दहशत निर्माण करण्यासह पुणे शहर व पिंपरी चिंचवड येथे ९ गुन्हे, लातूर जिल्ह्यात ३, परभणीमध्ये २, छत्रपती संभाजीनगरमध्ये १ आणि इतर जिल्ह्यांमध्ये ३ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे तो गुन्हेगारी टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचा संशय पोलिसांना आहे. महादेव मुंडे हत्या प्रकरणात ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गोट्या गित्तेचे नाव घेतल्यापासून तो पुन्हा चर्चेत आला. याआधीही परळीतील सरपंच बापू आंधळे हत्या प्रकरणात तो सहभागी होता, असा आरोप आहे.तर बीड पोलिसांकडून त्यांच्यावर मोक्काअंतर्गत कारवाई देखील करण्यात आली आहे. मग या आधीच गोट्या गित्तेला पोलिसांनी अटक का केले नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मालेगावातील डॉक्टरांना नोंदणी करण्याचे आदेश

■ मालेगाव

**मालेगावातील** सर्व खाजगी डॉक्टर व वैद्यकीय आस्थापनांनी १५ ऑगस्टपूर्वी नोंदणी किंवा नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी असे आदेश पालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी दिले आहे. ही प्रक्रिया न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे. आयुक्तांनी म्हटले की, हे आदेश शहरातील सर्व खाजगी रुग्णालये, दवाखाने, सोनोग्राफी केंद्र त्याचप्रमाणे आरोग्य सेवा केंद्रांना मुंबई नर्सिंग होम कायद्याप्रमाणे नोंदणी आवश्यक आहे.

# हिंगोली रेल्वे स्थानकात जुन्या रेल्वे बोगीला आग

**कोणतीही जिवितहानी नाही**



■ हिंगोली

**हिंगोली** शहराच्या रेल्वे स्थानक परिसरात आज सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास एका जुन्या व वापरात नसलेल्या रेल्वे बोगीला अचानक आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बोगी जळून खाक झाली. बोगी रिकामी असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मागील काही महिन्यांपासून हिंगोली रेल्वे स्थानकात तीन बोगी उभ्या आहेत. यातील एका बोगीला ही आग लागली. बोगीतून आगीचे लोट आणि धूर बाहेर निघत असल्याचे रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला बोलावण्यात आले. अग्निशमन विभागाने सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली.

# कोल्हापुरात गणेशोत्सवात लेझर लाईट वापरास बंदी

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यात गणेशोत्सव कालावधीत लेझर लाईट वापरास बंदी घालण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काढली. यानुसार २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत ही बंदी लागू असणार आहे. या बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई होणार आहे. संबंधितांवर कठोर शासन केले जाणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी येडगे यांनी दिला आहे. गणेशोत्सव काळात मिरवणुका, मूर्ती आगमन व विसर्जनाच्या कार्यक्रमांमध्ये अनेक गणेशोत्सव मंडळांकडून लेझर लाईटचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मागील वर्षी मिरवणुकीदरम्यान काही भाविकांच्या डोळ्यांवर थेट लेझर लाईट पडल्यामुळे डोळ्याच्या पडद्याला तसेच बुबुळाला गंभीर इजा झाल्याच्या घटना घडल्या होत्या.

# महसूल प्रशासनाविरुद्ध पुण्यात १४ ऑगस्टला हलगीनाद आंदोलन

**अधिकाऱ्यांना निलंबित करा**

■ खटाव

**कोणत्याही** प्रकारची महसूल प्रशासनाची परवानगी न घेता राजरोसपणे सोनाई इन्फ्रा प्रा. लि. पुणे ही कंपनी बेकायदा उत्खनन करून शासनाचा महसूल बुडवत असल्याच्या निषेधार्थ येत्या १४ ऑगस्टपासून महसूल विरोधात बेमुदत उपोषण व हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते दादा चव्हाण यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

महसूल प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माण तालुक्यातील अवैध मुरुम, डबर, दगड गौण खनिज उत्खनन करुन खटाव तालुक्यातील मायणी ते शामगाव घाटमार्गे रस्त्याचे काम करत असलेली पुणे येथील सोनाई इन्फ्रा प्रा. लि.या कंपनी उत्खननासाठी आता खटाव तालुक्यातील मौजे म्हासुर्णेत दाखल झाली आहे. महसूल विभागाची कोणत्याही प्रकारची पुर्वपरवानगी न घेता राजरोसपणे ही कंपनी उत्खनन करत आहे. या कंपनीच्या उत्खनास नक्की कोण पाठीशी घालत आहे ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.याठिकाणी लाखो ब्रास मुरूम व दगड याचे उत्खनन केले जात आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. तरी या परिस्थितीला जबाबदार असलेल्या महसूल अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसेच संबंधित कंपनीने केलेल्या अवैध मुरूम व दगड उत्खननाचे तात्काळ पंचनामे करून दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अन्यथा महसूल प्रशासनाच्या निषेधार्थ १४ ऑगस्टपासून विभागीय आयुक्त पुणे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत हलगीनाद आंदोलन व आमरण उपोषण केले जाईल.

# धाराशिव, रायगड, अमरावतीतील कार्यकर्त्यांचा भाजपात पक्षप्रवेश

■ धाराशिव

**स्थानिक** स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अवघे काही महिने शिल्लक असतानाच धाराशिव, रायगड, अमरावतीतील अनेक कार्यकर्त्यांनी भाजपात पक्षप्रवेश केला आहे. धाराशिवमधील उमरगा आणि लोहारा विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे माजी उमेदवार आणि प्रदेश काँग्रेसचे सचिव दिलीप भालेराव तसेच जिल्हा काँग्रेसचे माजी कार्याध्यक्ष प्रकाश आष्टे यांनी शेकडो समर्थकांसह आज भाजपात प्रवेश केला.

त्याचबरोबर वसई - विरारमध्ये शिवसेनेतील (ठाकरे गट) माजी पदाधिकारी, बविआचे माजी जिल्हाप्रमुख, नगरसेवक आणि रायगड, अमरावती जिल्ह्यातील विविध पक्षांच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन भाजपा प्रदेश कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा ही सर्वसामान्यांची पार्टी असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले. या कार्यक्रमाला आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार स्नेहा पंडीत-दुबे, प्रदेश सरचिटणीस आमदार विक्रांत पाटील, माधवी नाईक, माजी मंत्री आणि लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी उपस्थिती लावली होती.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
|| न मे भक्त प्रणश्यति ||

# उत्तरकाशीत हवामान खाते निरुत्तर

**निसर्ग** कसे आणि केव्हा रौद्ररूप धारण करेल हे सांगता येत नाही. उत्तरकाशी , धरारी यामध्ये झालेली ढगफुटी म्हणजे २०१३ च्या केदारनाथ महाप्रलयाची आठवण करून देणारी ठरते. संपूर्ण उत्तरकाशीचा परिसर डोंगरदऱ्यांवरच पसरलेला आहे. या भागात असलेल्या जलस्त्रोतांचे प्रमाण आणि प्रचंड उंचच्या उंच डोंगरदऱ्यांमध्ये इथल्या भूगर्भात आणि एकूणच पर्यावरणातही काही ना काही घडामोडी घडत असतात. यातल्या छोट्या मोठ्या नैसर्गिक आपत्तींशी लढण्याचे धैर्य तिथल्या लोकांमध्ये आलेले असते. मात्र ज्यावेळेला एखादी नैसर्गिक आपत्ती कमालीचे रौद्ररूप धारण करते. त्यावेळी एकूणच या भागातले जीवनमान बेभरोशाचे किंवा अधांतरी वाटू लागते. उत्तरकाशीतली ही ढगफुटी चित्रवाहिन्या आणि सोशल मीडियावरून दाखवली जात असताना त्याची भयंकरता काळजाचा थरकाप उडवणारी होती. अक्षरशः काही मिनिटांमध्ये डोंगरांचे कडेकपारे खाली कोसळत होते. त्यातून निर्माण झालेली धूळ आणि पाण्याचे प्रचंड लोट याचा वेग आणि दाब इतका प्रचंड होता की, तीन तीन चार चार मजली घरे अक्षरशः पत्त्याच्या बंगल्यांप्रमाणे कोसळताना पाहायला मिळाली. आतापर्यंतच्या माहितीप्रमाणे यामध्ये चार लोकांचा मृत्यू झाल्याचे समोर येते आहे. तर शंभरावर जास्त लोक चिखलात किंवा ढिगाऱ्याखाली अडकण्याची भीतीदेखील व्यक्त झाली आहे. जसजसे मदतकार्य पूर्ण होत जाईल. तसतशी तिथल्या जीवित आणि वित्तहानीचीसुद्धा माहिती समोर येईल. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, काश्मीर या सगळ्या भागामध्ये हवामान अगदी तासातासाला बदलण्याची शक्यता असते. कधी हिमवर्षाव तर कधी महापुरासारखी संकटे कोसळतात. या सगळ्या शक्यता लक्षात घेऊनच त्या भागातील लोक अधिकाधिक सुरक्षित ठिकाणी राहाण्याचा प्रयत्न करतात. परंतु गेल्या काही वर्षात तिथल्या अनेक भागांचे वेगाने नागरीकरण होते आहे. पर्यटन व्यवसायात प्रचंड वाढ झाल्याने बांधकामांबाबत नियमांचे पालन होत नाही. सरकारी यंत्रणांकडूनही पर्यावरणाचे संतुलन राखले जात नाही. अशा अनेक प्रकारांतून वेगवेगळ्या प्रकारचे दुष्परिणाम समोर येतात.

**लष्कराची विशेष मदत**

ज्याठिकाणी सदर हाहाकार घडला ते धरारी गाव गंगोत्रीला जाण्याच्या मुख्यमार्गावरच आहे. किंबहुना गंगोत्रीचा प्रवास सुरू करण्यापूर्वी पर्यटक मोठ्या प्रमाणावर याच गावात थांबतात. हॉटेल-रेस्टॉरंट याच्याशिवाय होमस्टेसारखे प्रकारही तिथे आहेत. गंगा नदीचे हे पाणलोट क्षेत्र असल्याने छोट्या छोट्या ओढ्या नाल्यांमध्येसुद्धा या ढगफुटीमुळे प्रचंड पाणीप्रवाह आला त्यामध्ये पंचवीसपेक्षा जास्त हॉटेल आणि होमस्टेच्या इमारती वाहून गेलेल्या आहेत. सुदैवाने या भागात बऱ्याचठिकाणी लष्करी तळे आहेत. जवळच्याच हर्षील गावातल्या लष्करी पथकाने तातडीने मदतकार्य पोहचवले. परंतु या हर्षील लष्करी तळाला या पुराचा तडाखा बसलेला आहे. त्यात आठ ते दहा जवान बेपत्ता असल्याचे सांगितले जाते. प्रथमदर्शनी खराब हवामानामुळे ही ढगफुटी झाल्याचे सांगितले जाते. परंतु प्रश्न निर्माण होतो की, आज सगळी आधुनिक यंत्रणा वापरून हवामानाचे अंदाज किंवा अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींचा अंदाज घेता येऊ शकतो. खरे तर हिमाचल असेल. काश्मीर असेल किंवा उत्तराखंड असेल या भागात कोणत्याही क्षणी हवामान बदलू शकते. तिथे दर तासाला या हवामान बदलाचा इशारा देणारी यंत्रणा कार्यरत असली पाहिजे. या ढगफुटीबाबत हवामानखात्याने कोणताच इशारा दिला नसेल तर त्या भागातील हवामान खाते किंवा वेधशाळा पूर्णपणे अपयशी ठरली असेच म्हणावे लागेल. २०१३ च्या केदारनाथच्या घटनेनंतर या सगळ्या परिसरात नैसर्गिक आपत्ती किंवा बदलत्या हवामानासंदर्भात प्रचंड सावधानता ठेवली जाणे आवश्यक ठरते. वेधशाळांकडून तर पाऊस किंवा चक्रीवादळाविषयी किमान ४८ तास आधी अंदाज सांगितले जातात आणि तो इशारा लक्षात घेऊन लोकांना सुरक्षितस्थळी नेण्याचा प्रयत्न होतो. ज्यामधून मनुष्यहानी तर टळतेच. शिवाय आर्थिक नुकसानही वाचवता येते. त्या ढगफुटीसंदर्भातही हवामान खात्याला किंवा वेधशाळांना किमान चोवीस तास आधी काही ना काही अंदाज देता आला असता आतापर्यंत आलेल्या माहितीप्रमाणे वेधशाळांकडून अशी कोणतीही माहिती स्थानिक पातळीवर दिली गेली नसल्याचे सांगितले गेले.

**आधुनिक हवामान तंत्र हवे**

या भागातील पर्यटनाचे लोकांना विशेष आकर्षण असते. निसर्गाचा तो एकाअर्थी चमत्कारच असतो. प्रचंड उंच डोंगरपर्वत आणि गंगा, अलकनंदा, मंदाकिनी यासारख्या नद्यांचे खळाळते प्रवाह पर्यटकांना आकर्षित करतात. याशिवाय धार्मिक दृष्टिकोनातूनही गंगोत्री, जमनोत्री बद्रीनाथ, केदारनाथ याठिकाणी जाणाऱ्यांची संख्या दरवर्षी सातत्याने वाढते आहे. अगदी यावर्षीच्या अमरनाथ यात्रेलासुद्धा जवळपास तीन कोटीपेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते. ही वाढती संख्या लक्षात घेऊन तिथल्या सगळ्या व्यवस्थांचे नियोजन किंवा नियंत्रण एकटे राज्य सरकार करू शकणार नाही. त्यासाठी केंद्राने अधिक लक्ष घातले पाहिजे. सुरक्षिततेबरोबरच अन्य व्यवस्थांच्यासंदर्भात अधिकाधिक यंत्रणांचा समन्वय ठेवून नियोजन करता येऊ शकते. आज जागतिक स्तरावर हवामान तंत्रज्ञान प्रचंड विकसित झालेले आहे. भारतासारखी अनेक प्रकारची नैसर्गिक विविधता असलेल्या देशात हे हवामानाचे तंत्रदेखील विकसित केले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत देशाच्या आणि जगाच्या अनेक भागातून येणाऱ्या पर्यटकांना पूर्णपणे निसर्गाच्या भरोशावर सोडून देता येणार नाही. सुदैवाने लष्कराचे तळ जवळ असल्याने तातडीने मदत पोहचू शकली. अन्यथा या सगळ्या पहाडी भागात कुठेही छोटीमोठी दरी कोसळली तरी गावांचा एकमेकांशी संपर्क तुटतो. आपण कितीही माहिती तंत्रज्ञानाचे कौतुक करीत असलो तरी अनेक ठिकाणी मोबाईललासुद्धा रेंज येत नाही. अशा एक ना अनेक गैरसोयी आणि त्रुटी तिथल्या सामान्य नागरिकांना आणि पर्यटकांना त्रासदायक ठरत असतात. या सर्वांबाबत केंद्र सरकार किती संवेदनशील आहे यावर बरेच काही अवलंबून राहाते.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**शर्यत हरण्यात कसलाच कमीपणा नाही. पण हरण्याच्या भीतीने शर्यतीत भागच न घेण्यात खरा कमीपणा असतो.**

## पंचांग

**गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**





**श्रावण शुक्ल त्रयोदशी**
**नक्षत्र : पूर्वाषाढा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २०-१० धनु**
**२०-११ ते २४-०० मकर**

**रवी उदय- ०६-१९**
**रवी अस्त- १९-१०**

**बृहस्पती पूजन; भगवान जिव्हेश्वर जयंती**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.


संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



## एगलेस मेयोनीज



★ **साहित्य** - मैदा-२ चमचे, साखर - १ टीस्पून, मोहरी पावडर - १ टीस्पून, क्रीम - १ कप, मीठ - अर्धा चमचा, व्हिनेगर - १ चमचा, काळी मिरी - १ चमचा, रिफाइंड ऑईल - ४ चमचे


★ **कृती** - एगलेस मेयोनीज बनविण्यासाठी प्रथम एका मोठ्या भांड्यात क्रीम आणि मैदा मिक्स करा. यानंतर एका बाऊलमध्ये लिंबाचा रस, व्हिनेगर आणि अर्धा चमचा मीठ घालून हँड ब्लेंडरच्या सहाय्याने एक मिनिट सर्व काही चांगले ब्लेंड करा. जर तुमच्याकडे हँड ब्लेंडर नसेल तर चमच्याच्या सहाय्याने ५ मिनिटे चांगले फेटून घेऊ शकता. क्रीम चांगले मिसळून घेतल्यास तुम्हाला मेयोनीजचा क्रीमी पोत मिळेल. तुमची एगलेस मेयोनीज रेसिपी तयार आहे. तुम्ही मेयोनीजमध्ये हर्ब्स टाकू शकता आणि त्यास भिन्न चव देऊ शकता.

आपण ते एअर टाइट काचेच्या जारमध्ये साठवून फ्रीजमध्ये ठेवू शकता. हे मेयोनीज १५ दिवस फ्रिजमध्ये ठेवल्याने खराब होत नाही. सँडविच, बर्गर किंवा पास्ता खाण्याचा विचार करत असाल तेव्हा तुम्ही हे घरगुती मेयोनीज वापरू शकता.



# नाओमी ओसाकाची चमकदार कामगिरी सुरूच
# नॅशनल बँक ओपनच्या उपांत्य फेरीत दाखल

**चार वेळा ग्रँड स्लॅम विजेती नाओमी ओसाकाने तिच्या चमकदार कामगिरीचा सिलसिला सुरू ठेवत नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि तिने १० व्या मानांकित एलिना स्वितोलिनाचा ६-२, ६-२ असा पराभव केला.या स्पर्धेच्या अंतिम चारमध्ये पोहोचण्याची ओसाकाची ही पहिलीच वेळ आहे.आता ओसाकाचा सामना १६ व्या मानांकित क्लारा टॉसनशी होईल.**



■ न्यूयॉर्क

**टॉसनने** उपांत्यपूर्व फेरीत सहाव्या मानांकित मॅडिसन कीजचा ६-१, ६-४ असा पराभव केला. अशाप्रकारे ओसाकाने २०२२ मध्ये मियामी येथे अंतिम फेरी गाठल्यापासून डब्लूटीए १००० स्पर्धेत तिची सर्वोत्तम कामगिरी सुरू ठेवली. जपानची रहिवासी असलेली ही खेळाडू तिच्या कारकिर्दीतील आठवे आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपननंतर पहिले जेतेपद पटकावण्याच्या प्रयत्नात आहे.दुसऱ्या उपांत्य फेरीत कॅनेडियन किशोरवयीन व्हिक्टोरिया म्बोकोचा सामना नवव्या मानांकित कझाकस्तानच्या एलेना रायबाकिनाशी होईल.

या स्पर्धेत कॅनडाच्या १८ वर्षीय व्हिक्टोरिया मबोकोने स्पेनच्या मॅनिरोचा पराभव करत एकेरीची उपांत्य फेरी गाठली. आता मबोको आणि रायबाकिना यांच्यात उपांत्य फेरीचा सामना होईल. कॅनडाच्या मबोकोने उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात स्पेनच्या जेसिका मॅनिरोचा ६-४, ६-२ अशा सरळ सेट्समध्ये फडशा पाडत शेवटच्या चार खेळाडूंत स्थान मिळविले.या स्पर्धेत दोन दिवसांपूर्वी झालेल्या सामन्यात मबोकोने अमेरिकेच्या टॉपसिडेड कोको गॉफचा केवळ ६२ मिनिटांच्या कालावधीत पराभव केला होता. या स्पर्धेत २०१९ नंतर कॅनडाची सर्वात कमी वयाची मबोको ही पहिली टेनिसपटू ठरली आहे. २०१५ साली बेलिंडा बेन्सिकने ही स्पर्धा कमी वयोमनात जिंकली होती. दुसऱ्या एका सामन्यात इलिना रायबाकिनाने युक्रेनच्या कोस्ट्युकचा ६-१, ६-१ असा पराभव करत शेवटच्या चार खेळाडूंत स्थान मिळविले. कझाकस्थानच्या नवव्या मानांकीत रायबाकिनाचा उपांत्य फेरीचा सामना मबोकोशी होणार आहे. हाताला झालेल्या दुखापतीमुळे कोस्ट्युकने हा सामना अर्धवट सोडल्याने रायबाकिनाला विजय म्हणून घोषित करण्यात आले. या स्पर्धेतील अंतिम सामना येत्या शुक्रवारी खेळविला जाईल.

## न्यूझीलंडचा विल ओ'रोर्क दुसऱ्या कसोटीतून बाहेर



■ हरारे

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज विल ओ'रोर्कला पाठीच्या दुखापतीमुळे झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडावे लागले.पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी ओ'रोर्कला दुखापत झाली होती.त्यानंतर त्याला पुढील वैद्यकीय तपासणीसाठी न्यूझीलंडला पाठवण्यात आले.

न्यूझीलंड संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर आहे.दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळली जात असून न्यूझीलंड संघाने पहिली कसोटी ९ विकेट्सने जिंकली.दुसरी कसोटी ७ ऑगस्टपासून सुरू होईल. ओ'रोर्कच्या आधी वेगवान गोलंदाज अष्टपैलू नॅथन स्मिथलाही पोटाच्या स्नायूंमध्ये ताण आल्याने दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडावे लागले आहे. त्याच्या जागी झाचेरी फॉल्क्सला पहिल्यांदाच कसोटी संघात स्थान देण्यात आले.आता ओ'रोर्कच्या दुखापतीमुळे ऑकलंड एसेसचा डावखुरा वेगवान गोलंदाज बेन लिस्टरला संघात बोलावण्यात आले आहे. लिस्टरला आधी बॅकअप म्हणून समाविष्ट करण्यात आले होते आणि आता तो संघात राहील.

## हॉटेलला आग लागल्याने बुद्धिबळ स्पर्धा पुढे ढकलली

■ चेन्नई - हयात रीजन्सी हॉटेलमध्ये आग लागल्याने आजपासून सुरू होणारी चेन्नई ग्रँडमास्टर बुद्धिबळ स्पर्धा गुरुवारपर्यंत पुढे ढकलण्यात आली.या स्पर्धेत भारत आणि परदेशातील अनेक खेळाडू सहभागी होत आहेत.इंडियन ग्रँडमास्टर आणि टूर्नामिंट डायरेक्टर श्रीनाथ नारायणन यांनी त्यांच्या एक्स हँडलवर लिहिले की,चेन्नई ग्रँडमास्टरच्या स्थळ असलेल्या हॉटेल हयात रीजन्सीमध्ये काल रात्री आग लागली.सर्व खेळाडू सुरक्षित आहेत.

## आयसीसी कसोटी गोलंदाज क्रमवारीत सिराजची १५ व्या स्थानावर झेप

■ दुबई



**आयसीसीने** जाहीर केलेल्या कसोटी गोलंदाज क्रमवारीत सिराजने मोठी उडी मारली.त्याने थेट १२ स्थानांची झेप घेतल्याने या क्रमवारीत तो १५ व्या स्थानी पोहोचला. त्याच्या खात्यात आता ६७४ गुण झालेले आहेत.तर प्रसिद्धनेही गरुड झेप घेतली असून तो ८४ स्थानावरुन थेट ५९ व्या क्रमांकावर विराजमान झाला.

भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वालने पुन्हा एकदा टॉप ५ मध्ये धडक दिली. यशस्वीने इंग्लंड दौऱ्यातील ५ सामन्यांत ४१.१०च्या सरासरीने ४११ धावा केल्या. यशस्वीने अंतिम सामन्यात शतक केले.यशस्वीला त्यामुळे ३स्थानांचा फायदा झाला आहे. यशस्वीने ८व्या क्रमांकावरुन पाचव्या स्थानी झेप घेतली आहे.यशस्वीच्या खात्यात ७९२ गुण आहेत. तसेच इंग्लंडचा जो रुट पहिल्या स्थानी कायम आहे.

## १७ वर्षांखालील आशियाई फुटबॉल पात्रता स्पर्धा अहमदाबादमध्ये होणार

■ अहमदाबाद

नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या एएफसी १७ वर्षांखालील आशियाई चषक पात्रता फुटबॉल स्पर्धेचे यजमानपद एकूण ७ देशांना मिळणार आहे. भारत हा त्यापैकी एक देश आहे. २२ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा अहमदाबादमध्ये होणार आहे. एरेना येथे या स्पर्धेतील सर्व सामने खेळविण्यात येतील.या पात्रता स्पर्धेचा ड्रॉ उद्या काढण्यात येणार आहे.

क्वालिफायर्समध्ये एकूण ३८देशांचा सहभाग असून त्यांचे एकूण सात गट करण्यात येतील.त्यापैकी सहा संघांचे तीन तर पाच संघांचा समावेश असलेले चार गट असतील. गटविजेता संघ २०२६ मध्ये सौदी अरेबियात होणाऱ्या एएफसी १७ वर्षांखालील आशियाई चषक स्पर्धेसाठी पात्र ठरतील.कतरमधील फिफा १७ वर्षांखालील विश्वचषक २०२५ स्पर्धेतील याआधीच थेट पात्र ठरलेले ९ संघही सौदी अरेबियातील स्पर्धेत सहभागी होतील.क्वालिफायर्समधील ३८संघ सहा पॉट्समध्ये त्यांचे मानांकन व नियमानुसार विभागण्यात येतील.

## ग्रेटर नोएडात ७ ऑगस्टपासून मुष्टीयुद्ध स्पर्धेला सुरुवात

■ नवी दिल्ली

अखिल भारतीय मुष्टीयुद्ध फेडरेशनच्या उपकनिष्ठांची राष्ट्रीय मुष्टीयुद्ध स्पर्धा ग्रेटर नोएडामध्ये ७ ते १३ ऑगस्ट दरम्यान आयोजित केली. या स्पर्धा १५ वर्षांखालील मुले आणि मुलींच्या विभागात घेतली जाणार असून यामध्ये सुमारे ७०० स्पर्धक सहभागी होत आहेत.उपकनिष्ठांची ही स्पर्धा १५ विविध वजन गटामध्ये घेतली जाणार आहे.

## विश्व रॅकेटलॉन चषक स्पर्धा भारताने जेतेपद पटकाविले

■ रोटरडॅम



रोटरडॅम येथे झालेल्या विश्व रॅकेटलॉन चॅम्पियनशिप चॅलेंजर्स चषक स्पर्धेचे अजिंक्यपद भारताने पटकाविले. विक्रमादित्य चौफुल्लाच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अंतिम सामन्यात डेन्मार्कवर थरारक विजय मिळवित जेतेपद हस्तगत केले.या स्पर्धेमध्ये भारताने उपांत्यपूर्वफेरीच्या लढतीत अमेरिकेचा पराभव केला.त्यानंतर चुरशीच्या उपांत्य लढतीत भारताने जर्मनीवर मात करत अंतिम फेरी गाठली.डेन्मार्क आणि भारत यांच्यात जेतेपदासाठीची लढत झाली.भारतीय रॅकेटलॉन संघातील खेळाडूंनी दर्जेदार खेळाचे प्रदर्शन घडवित डेन्मार्कचा पराभव केला. जेतेपद मिळविणाऱ्या भारतीय संघामध्ये प्रशांत सेन, निहीत सिंग,सुहेर कपूर,कृष्णा कोटक,निधी तिवारी,राघव जेटिया यांचा समावेश आहे. रॅकेटलॉन या क्रीडा प्रकारामध्ये टेबल टेनिस,बॅडमिंटन,टेनिस आणि स्क्वॅशमधील चार रॅकेटस्चा वापर केला जातो.

## ठाणे वर्षा मॅरेथॉन १० ऑगस्टला! १५ हजारांहून अधिक धावपटू धावणार

■ ठाणे

ठाण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली ३१ वी ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन यावर्षी १० ऑगस्ट रोजी होणार आहे. यंदाही स्पर्धेत टाईम टेक्नॉलॉजीचा वापर २१ किमी पुरूष व महिला, १८वर्षांवरील १० किमीच्या स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. याची स्पर्धा 'मॅरेथॉन ठाण्याची.. उर्जा तरुणाईची'या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धावपटूंसह १५ हजारांहून अधिक धावपटू धावतील, असा विश्वास पालिकेला आहे.

१० ऑगस्ट रोजी सकाळी ६.३० वाजता महापालिका मुख्यालय चौकातून या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धा विविध १२ गटांत घेण्यात येणार आहे.या मॅरेथॉन स्पर्धेसाठी ऑफलाईन नोंदणी एकूण १३,८६० इतकी झाली आहे.१२ वर्षांखालील मुले ३ कि.मी -२३७८,मुली ३ कि.मी २०५१, १५वर्षांखालील मुले ५कि.मी -४६४१,मुली ५ कि.मी-४०१८,१८वर्षांखालील मुले १०कि.मी-९६५,६०वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक महिला १ कि.मी-२२ ,पुरूष कि.मी ११तर कॉर्पोरेट रन १ कि.मी साठी १४आदी नोंदणी झाली आहे.तर ऑनलाईन नोंदणी १८५०इतकी झाली आहे.पुरुष २१कि.मी खुला गट- ६१०,महिला २१कि.मी-१९०,१८वर्षांवरील पुरूष १०कि.मी-७३०,१६वर्षांवरील महिला १०कि.मी -३२० इतकी नोंदणी झाली आहे. महापालिका अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी १ कि.मी ची 'कॉर्पोरेट रन' ठेवण्यात आली असून या स्पर्धेत महापालिका अधिकारी कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. यंदाची ठाणे महापालिका ही स्पर्धा ६ वर्षांनी होत आहे, स्पर्धेच्या दिवशी वातावरणनिर्मिती आणि स्पर्धा सुरू होण्यापूर्वी स्पर्धेच्या सरावासाठी झुंबा वर्कआऊटचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका मुख्यालयासमोर उभारण्यात येणाऱ्या स्टेजसमोर झुंबा वर्कआऊट होणार आहे.

# बुलेट ट्रेनच्या बोगदा कामामुळे पालघरमध्ये २०० घरांना तडे

■ पालघर

**मुंबई- अहमदाबाद** बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत सफाळा पश्चिमेला जलसार, टेंभीखोडावे व विराथन गावादरम्यान असलेल्या डोंगरामध्ये बोगदा तयार करण्याचे काम सुरू आहे.परंतु या कामासाठी केल्या जाणाऱ्या स्फोटांमुळे जलसार, टेंभीखोडावे व विराथन बुद्रुक या गावांमधील २०० पेक्षा अधिक घरांच्या भिंतीला व फरशीला तडे गेले आहेत. हे काम पुढील सहा ते आठ महिने चालणार असल्याने आणखी मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती येथील नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

जलसार गावाच्या लगत असणाऱ्या डोंगरामधून बुलेट ट्रेनसाठी बोगदा उभारण्याचे काम चार महिन्यांपूर्वी हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी



याकडे स्फोट घडवले जात आहेत. हे स्फोट जास्त तीव्रतेचे असल्याने त्या ठिकाणापासून सुमारे एक ते दीड किलोमीटर पर्यंत असणाऱ्या घरांना लहान मोठे तडे गेले आहेत. अनेक घरांची फरशी तुटली आहे. याबाबत संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली होती. मात्र याविषयी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.यामध्ये नुकसान झालेल्या घरांना भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत पालघरचे तहसीलदार रमेश शेंडगे यांनी सांगितले की, जलसार परिसरातील घरांच्या झालेल्या नुकसानीच्या आढावा घेण्यासाठी संबंधित ठेकेदार व ग्रामस्थांनी स्वतंत्र तांत्रिक सल्लागार नेमले आहेत. या दोन संस्थांमध्ये संयुक्तपणे अभ्यास दौरा करून अहवाल सादर करणार आहेत. त्यानंतर नुकसान भरपाईबाबत निश्चित निर्णय घेण्यात येईल.

# मतदारयादी प्रश्नी चर्चा नाही किरेन रिजिजूंचे स्पष्टीकरण

■ नवी दिल्ली

**संसदेत** बिहार मतदार याद्यांच्या प्रश्नावर चर्चा होऊ शकत नाही. स्वायत्त संस्था व न्यायप्रविष्ट प्रकरणांवर संसदेत चर्चा होत नसते. असे स्पष्टीकरण संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिले.

आज संसदेत बिहारच्या मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रश्नावर चर्चा घेण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. सत्ताधारी पक्षाने त्यावर आक्षेप घेत ही चर्चा होऊ नये अशी भूमिका घेतली. त्यामुळे संसदेचे कामकाज आधी दोनदा व नंतर दिवसभरासाठी तहकुब करावे लागले. बिहार मतदार यादी पुनरिक्षण प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे.

# एनसीईआरटी पुस्तकातील नकाशा जैसलमेरच्या राजघराण्याचा आक्षेप

**चैतन्य राज सिंह यांची एक्स पोस्ट**

■ जयपूर

**राष्ट्रीय** शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) सामाजिक विज्ञान विषयाच्या पुस्तकातील काही बदलांवर आक्षेप नोंदवले आहेत. जैसलमेरच्या राजघराण्यातील सदस्य चैतन्य राज सिंह यांनी या पुस्तकातील मराठा साम्राज्याच्या नकाशावर आक्षेप घेतला आहे. पुस्तकातील नकाशामध्ये जैसलमेरला मराठा साम्राज्याचा भाग म्हणून दर्शवले असून हे पूर्णपणे चुकीचे आहे, चैतन्य यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात चैतन्य यांनी एक्सपोस्ट शेअर केली आहे. यात त्यांनी म्हटले की, एनसीईआरटीच्या इयत्ता ८ वीच्या सामाजिक विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात एक नकाशा आहे. या नकाशात जैसलमेरला मराठा साम्राज्याचा भाग म्हणून दाखवले आहे. ही बाब इतिहासाबाबत दिशाभूल करणारी, तथ्यहिन व आक्षेपार्ह आहे. एनसीईआरटीसारख्या संस्थेच्या पाठ्यपुस्तकांमध्ये अशा प्रकारची अप्रमाणित व ऐतिहासिक पुराव्यांशिवाय दिलेली माहिती ही संस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या गोष्टी आपल्या गौरवशाली इतिहासावर व जनभावनेवर आघात करतात. ही फक्त एका पाठ्यपुस्तकातील चूक नाही. आमच्या पूर्वजांच्या बलिदानाचे, सार्वभौमत्वाचे व शौर्याचे अपमानास्पद चित्रण असल्याचे यातून भासत आहे. याप्रकरणी लवकरात लवकर ठोस व प्रभावी कारवाई होईल अशी आमची अपेक्षा आहे.

# ब्राझीलच्या माजी राष्ट्राध्यक्षांना नजरकैदेत ठेवण्याचे आदेश

■ ब्राझिलिया

**ब्राझीलचे** माजी राष्ट्रपती जैर बोल्सोनारो यांना त्यांच्या घरात नजरकैदेत ठेवण्याचे आदेश ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. २०२२ सालच्या राष्ट्रपती निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही सत्तेत राहण्यासाठी त्यांनी बंडाचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बोल्सोनारो यांनी आधीच लागू केलेल्या सावधगिरीच्या निर्बंधांचे उल्लंघन केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

या प्रकरणाचे निरीक्षण करणारे न्यायमंत्री अलेक्झांड्रे डी मोरेस म्हणाले की, बोल्सोनारो यांनी त्यांच्या तीन खासदार पुत्रांद्वारे सार्वजनिक संदेश पाठवले होते. यामुळे निर्बंधांचे उल्लंघन झाले. रविवारी रिओ दि जानेरो येथे त्यांच्या समर्थकांच्या एका रॅलीला बोल्सोनारो यांनी त्यांच्या मुलाच्या फोनवरून संबोधित केले होते. यामुळे नियमांचे उल्लंघन झाले.

# मी विरोधी पक्षनेता होणार! भास्कर जाधवांचा विश्वास



■ रत्नागिरी

**लवकरच** महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. त्यात मी मंत्री असणार आहे. पण त्याआधी हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेता होणार आहे,असा ठाम विश्वास शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार भास्कर जाधव यांनी येथे व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उबाठा जिल्हा परिषद उपाध्यक्ष महेश नाटेकर आणि सदस्य नेत्रा ठाकूर यांनी साथ सोडल्यानंतर, आमदार भास्कर जाधव यांच्या नेतृत्वाखाली वेळणेश्वर येथे शिवसेनेचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात, भास्कर जाधव यांचे पुत्र विक्रांत जाधव यांचे भाषण सुरू असताना जाधव अश्रूंनी भावुक झाले.

तर येणाऱ्या काळात संपूर्ण शिवसेना पुन्हा उद्धव ठाकरे यांच्याकडे परत येणार असा विश्वास यावेळी भास्कर जाधवांनी व्यक्त केला. भास्कर जाधव म्हणाले की, २००९ ते २०१४ मध्ये मी मंत्री असताना रामदास कदम यांनी एकदा माझे पाय धरले होते. कदम हा वाघ नाही तर बिबट्या आहे.

रामदास कदम यांना मी सांगतो, मी कोणाच्या सावलीला सुद्धा घाबरत नाही.माझ्या नशिबात जे असेल तेच मला मिळणार आहे. मी कोणालाही विरोध केलेला नाही, आणि करणारही नाही. तू माझ्या पाया पडलास आणि माझ्या योगेशला तुझ्या पदरात टाकतो बोललास. मी कधीच तुझ्या पाया पडलो नाही.लाज वाटली पाहिजे तुम्हाला ३० वर्षे बार पत्नीच्या नावावर होता. भडवेगिरीचे पैसे कमावले . तुम्ही गृहराज्यमंत्री असताना आणि आता तुमचा मुलगा गृहराज्यमंत्री असताना बार बंद करावा असे कधी वाटले नाही.

# पुण्याच्या झेड ब्रिजजवळ राडा! १ जण जखमी

■ पुणे

**पुण्यातील** सदाशिव पेठेतील झेड ब्रिजजवळ काल रात्री ८ वाजताच्या सुमारास दोन गटांत तुफान राडा झाला. यामध्ये एका तरुणावर कोयत्याने हल्ला करण्यात आल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाला आहे.

पुण्यात गुन्हेगारीत वाढ होत असताना या प्रकाराने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री- अपरात्री गाड्यांची तोडफोड होऊ लागली आहे. कोयता गँगची दहशतही वाढत आहे. अशातच काल रस्त्याच्या मध्यभागी दोन गटांनी एकमेकांवर कोयता, दगड, काठ्यांनी जोरदार हल्ला केला. यादरम्यान एकजण कोयत्याच्या वाराने गंभीर जखमी झाला. घटनास्थळी वाहनांची वर्दळ सुरु असतानाच हा राडा झाल्याने नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

अचानक सुरू झालेल्या या हाणामारीमुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. काही वेळ रस्त्यावर गोंधळाचे वातावरण होते. या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात पाच ते सहा जणांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या महान परंपरेला कलंक

**संजय राऊत यांची टीका**

■ मुंबई



**एकेकाळी** भाजपाच्या प्रवक्त्या असलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती करणे हा उच्च न्यायालयाच्या महान परंपरेला लागलेला कलंक आहे,अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी साठे यांच्या नियुक्तीवर जळजळीत भाष्य केले.

न्याय व्यवस्थेत संघाची माणसे घुसवणे ही भाजपाची पूर्वीपासूनची नीती राहिली आहे.मुंबई उच्च न्यायालयात आधीच पाच न्यायाधीश संघ परिवाराशी संबंधित आहेत. आता आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश पदी नियुक्ती करणे हा मुंबई उच्च न्यायालयाला लाभलेल्या महान परंपरेला लागलेला कलंक आहे. भाजपाने अशाच प्रकारे राज्या राज्यांमध्ये न्याय व्यवस्थेत संघाची माणसे घुसवली आहेत. एका प्रकारे या देशाची न्याय व्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्याचा भाजपाचा हा राक्षसी प्रयत्न आहे,असे राऊत म्हणाले.

उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका आठवड्यात दुसऱ्यांदा दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. याबद्दल छेडले असता राऊत म्हणाले की, शिंदेंच्या पक्षाचे प्रमुख अमित शहा दिल्लीत असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या पक्षाचे मार्गदर्शक आहेत. त्यामुळे शिंदेंना वारंवार दिल्लीत खेटे घालावे लागतात. मोदी-शहांभोवती घुटमळत रहावे लागते. तासन तास त्यांच्या भेटीसाठी संसद भवनासमोरच्या लॉनवर बसून रहावे लागते.

# शिरोळ तालुक्यात रस्त्यावर मगर

■ कोल्हापूर

**शिरोळ** तालुक्यातील अकिटवाट येथील राजापूर रस्त्यावर पुलालगत भलीमोठी मगर आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सोमवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास ही मगर पूल पार करत असताना शेतकऱ्यांना दिसली. सध्या कृष्णा नदीची पाणीपातळी घटली आहे. त्यामुळे मगरींचा नैसर्गिक अधिवास बाधित झाला आहे. नव्या अधिवासाच्या शोधात मगरी मानवी वस्तीकडे वळताना दिसत आहेत. पुलाखाली दाट गवत आणि पानझाडी असल्याने याठिकाणी मगरी वावरताना दिसत आहेत. वनविभागाने घटनास्थळी पथक पाठवावे आणि नागरिकांनी रात्रीच्या वेळी नदीकाठी, रस्त्यावर फिरणे टाळावे, असे आवाहन अकिटवाटचे माजी सरपंच विशाल चौगुले यांनी केले आहे.

# पालघरच्या तरुणाची युरोपमध्ये फसवणूक

**गायब करण्याच्या धमक्या**

■ पालघर

**पालघरमधील** उमेश धोडी या तरुणाची चांगल्या नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात आली. उमेश पालघरमधील बच्चू मिया चाळ येथे राहतो. त्याने मनसेच्या तुलसी जोशी यांच्याशी संपर्क साधून हा प्रकार सांगून मदतीची विनंती केली आहे.

उमेश धोडीला बडोदा येथील एका खासगी एजंटच्या माध्यमातून युरोपमधील अल्बानिया देशातील अमेक सोल्युलर ग्रुप या कंपनीत नोकरी मिळाल्याचे सांगण्यात आले. तिकडे गेल्यावर त्याला कंपनीकडून कोणत्याही सुविधा देण्यात आल्या नाहीत. एवढ्या मोठ्या कंपनीमध्ये मेडिकल इन्शुरन्स का नाही, असा प्रश्न उमेशने उपस्थित केला. त्यावर कंपनीने खोटी माहिती देत विषय टाळला. त्यानंतर त्याच्यावर खोटे आरोप लावत नोकरीवरून काढून टाकले. उमेश धोडी म्हणाला की, मला युरोपमधून गायब करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत.

# आज 'माधुरी' हत्तीणीसाठी तारदाळमध्ये 'गाव बंद'ची हाक

■ हातकणंगले



**कोल्हापूरच्या** शिरोळ तालुक्यातील नांदणीतील माधुरी हत्तीणीला गुजरातमधून परत आणण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न सुरू आहेत.हा प्रश्न सुप्रीम कोर्ट आणि केंद्र सरकारपर्यंत पोहचला आहे.

या पार्श्वभूमीवर माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी आणि पेटा व वनताराच्या कृत्याचा निषेध नोंदविण्यासाठी गुरुवार ७ ऑगस्ट रोजी तारदाळ गावात प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने गाव बंदीची हाक दिली. याबाबतचे निवेदन शहापूर पोलीस ठाण्यास देण्यात आले आहे.गेल्या बाराशे वर्षांपासून नांदणी गावातील जैन मठात हत्ती पाळण्याची प्रथा आहे.या परंपरेनुसार या मठात वास्तव्यास असलेल्या माधुरी ऊर्फ महादेवी नावाच्या हत्तींणीला 'पेटा' च्या आक्षेपावरून गुजरातला नेले आहे.हे सर्व पेटा आणि वनतारा प्राणी कल्याण केंद्र यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी घडवुन आणले आहे. त्यामुळे पेटा आणि वनताराचा निषेध नोंदविण्यासाठी 'एक दिवस माधुरीसाठी' म्हणत प्रहार जनशक्ती पक्षाने तालुक्यातील तारदाळ गाव बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# महिला आयोगाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे पगार रखडले

■ मुंबई

**वांद्रे** येथील राज्य महिला आयोगाच्या कार्यालयात काम करणाऱ्या शासन सेवेतील १८ कर्मचाऱ्यांचा जुलै महिन्याचा पगार रखडला आहे, अशी माहिती हाती आली आहे.

या कार्यालयात काम करणाऱ्या शासनातील कर्मचाऱ्यांना दरमहा १ तारखेला पगार मिळतो. आता जुलै महिना संपून ऑगस्टची ६ तारीख आली. तरीही आमच्या हातात पगार पडलेला नाही. या महिन्यात सणासुदीचे दिवस आहेत. घर खर्च पगाराविना चालवायचा कसा? अशी व्यथा मांडून कर्मचारी पुढे म्हणाले की, पगार का रखडले याचे कारण गुलदस्त्यात आहे.

वरील संदर्भात महिला आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, एका वरिष्ठ अधिकाऱ्याने या माहितीला दुजोरा देत असे सांगितले की, कामाच्या वेळेतील अनियमितता तसेच रजा यांच्यातील ताळमेळ या सर्व बाबींची पूर्तता व पडताळणीमुळे पगार रखडले आहेत. लवकरच पगार कर्मचाऱ्यांच्या हातात पडतील. काळजीचे कारण नाही.

# ट्रेलरमध्ये लपवलेली ३६ लाख रुपयांची दारू जप्त

■ वैभववाडी

**तालुक्यातील** सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर दरम्यान असलेल्या करूळ चेक नाक्यावर गोवा बनावटीची दारूची वाहतूक करणारा १६ चाकी ट्रेलर वैभववाडी पोलिसांनी जप्त केला आहे. या ट्रेलरमधून सुमारे ३६ लाख ६ हजार रुपयांची गोवा बनावटीची दारू व २३ लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा ट्रेलर असा एकूण ५९ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी चालक नवीन सुरेश कुमार (२९) व वीरेंद्र भरतसिंग (४२) या हरियाणातील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. करूळ चेक नाका येथे पोलीस हवालदार समीर तांबे, रंजीत सावंत, हरिप्रसाद हाके हे ड्युटीवर होते. मंगळवारी सकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास गोव्याहून कोल्हापूरकडे जाणारा १८ चाकी ट्रेलर करूळ चेकनाक्यावर आला असता नेहमीप्रमाणे तो तपासणीसाठी थांबवण्यात आला. चालकाकडे



चौकशी केली असता त्याने ट्रेलरमध्ये बायोमास प्युअर ट्रिक्स असल्याचे सांगितले.

पोलिसांनी तपासणी केली असता ट्रेलरमध्ये प्लायवूडने जागा करून त्यात लपवलेले ११०० बॉक्स सापडले. यातील प्रत्येक बॉक्समध्ये ४८ दारूच्या बाटल्या होत्या. एकूण ३६ लाख ९६ हजार रुपयांची गोवा बनावटीची दारू पोलिसांनी ट्रकमधून हस्तगत केली.

# उद्योगपती अनिल अंबानींची ईडीकडून १० तास चौकशी

**१७ हजार कोटी कर्ज घोटाळा प्रकरण**

■ नवी दिल्ली



**१७ हजार** कोटी रुपयांच्या बँक कर्ज घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणाच्या संदर्भात उद्योगपती अनिल अंबानी यांची 'ईडी'कडून तब्बल १० तास चौकशी करण्यात आली.अंबानी हे काल मंगळवारी सकाळी ११ वाजता मध्य दिल्लीतील ईडी कार्यालयात पोहोचले आणि रात्री ९ वाजता कार्यालयातून बाहेर पडले. अनिल अंबानी यांचे जबाब मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत नोंदवण्यात आले आहेत.त्यांना सुमारे एक डझन प्रश्न विचारण्यात आले होते.अंबानी यांनी कोणतेही चुकीचे कृत्य केल्याचे नाकारले आहे आणि त्यांच्या कंपन्यांनी त्यांच्या आर्थिक स्थितीबद्दल नियामकांना वेळेवर माहिती दिली आहे असे त्यांनी म्हटले आहे. ईडी मात्र अनिल अंबानींच्या उत्तरांशी सहमत नाही.त्यामुळे त्यांना पुन्हा चौकशीला बोलावले जाऊ शकते. २४ जुलै रोजी ईडीने ५० कंपन्यांच्या ३५ परिसरांची आणि मुंबईत त्यांच्या व्यवसाय गटाच्या अधिकाऱ्यांसह २५ जणांची झडती घेतली होती.त्यानंतर त्यांना समन्स जारी करण्यात आले होते.

# विद्यार्थिनीशी अश्लील वर्तन पिंपरीतील शिक्षक निलंबित

■ पिंपरी

महापालिकेच्या शाळेत विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन करणाऱ्या ५३ वर्षीय शिक्षकाला निगडी पोलिसांनी अटक केली आहे. आज पिंपरी-चिंचवड महापालिकेने त्याला निलंबित करून त्याची खातेनिहाय चौकशी सुरू केली आहे. संतोष हरिभाऊ बेंद्रे (५३) हा पदवीधर शिक्षक शाळेत सातवीच्या वर्गाला शिकवत होता. अध्यापनाच्या नावाखाली त्याने वर्गातील विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन केल्याची तक्रार पालकांनी केली होती. या तक्रारीनंतर बेंद्रेविरुद्ध निगडी पोलीस ठाण्यात पोक्सो कायदा आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. निगडी पोलिसांच्या गुन्हे तपास विभागाने बेंद्रे याला अटक केल्याचे पत्राद्वारे कळविले. हा अहवाल आल्यानंतर पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने त्याच्यावर निलंबनाची कारवाई करून त्याची खातेनिहाय चौकशी सुरू करण्याचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सुचना क्र./२१/२०२५**

खालील कामांसाठी म.औ.वि. महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा **(www.mahatenders.gov.in)** या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रूपये | कोरी ई- निविदा संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| अ) | **का.अ., मऔविम, माहिती तंत्रज्ञान विभाग, पुणे.** | | | |
| १ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.१ व २ रस्ते देखभाल व दुरूस्ती...रस्त्याच्या हद्दीतील व महामंडळाच्या भूखंडावरील अतिक्रमण काढणे व देखरेख करणे. | ३९,६०,१५२/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| २ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.३ रस्ते देखभाल व दुरुस्ती... टप्पा क्र.३ मधील रस्त्याच्या कडेच्या मोकळ्या जागेस व खुला भुखंड क्र.५/१ येथे चेनलिंक कुंपण करून शोभिकरण करणे. | ३९,७४,५५०/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ३ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.३ रस्ते देखभाल व दुरुस्ती... वार्षिक कालावधीसाठी बाणेर संपर्क रस्त्याच्या काही भागाची दुरुस्ती व खड्डे भरणे. सन २०२५-२६ | ३९,८३,८४६/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ४ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.२ रस्ते देखभाल व दुरुस्ती... टप्पा क्र. २ मधील खराब झालेल्या रस्त्यावर डाबराने प्रक्रिया करणे. | ३९,९५,३९३/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ५ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र. २ रस्ते देखभाल व दुरूस्ती...क्रोमाजवळ ६०० मी.मी.व्यासाची RCC पाईप लाईन टाकणे व विप्रोपासुन बटरफ्लाय ट्रम्पोलिन पार्क या दरम्यान गटार दुरुस्ती करणे. | ३९,८६,१८५/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ६ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.३ रस्ते देखभाल व दुरुस्ती... वार्षिक कालावधीसाठी टप्पा क्र.३ मधील रस्त्याची दुरुस्ती करणे व रस्त्यावरील खड्डे भरणे. | ३९,९२,९८७/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ७ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.१, २ व ३ रस्ते देखभाल व दुरुस्ती... हिंजवडी एमआयडीसी येथील विविध व्यासाच्या ड्रेनेज लाईन्स साफ करणे. | ३९,०८,८९६/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ब) | **का.अ., मऔविम, विवयां विभाग, पुणे.** | | | |
| १ | पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... बिजाली नगर येथील बूस्टर पंप हाऊसमध्ये मीटरिंग क्यूबिकल बदलून संबंधित कामे करणे. | ६,०४,७८१/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| २ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अशुध्द उर्ध्व जलवाहिनीवरील पाण्याची चोरी थांबविण्याकरीता दैनंदिन उर्ध्वजलवाहिनीची पाहणी करणे. | १८,९९,८२५/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ३ | हिंजवडी माहिती तंत्रज्ञान उद्यान... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... अशुध्द जल उदंचन केंद्र कार्यवहनाकरीता मनुष्यबळ पुरविणे. | ३८,५६,५६०/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ४ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाण्याचा रंग सुधरवणे व वास घालविण्याकरीता बेनटोनाईट क्ले आणि शैवालनाशक प्रनालीचा वापर करणे. | ३९,७४,७००/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ५ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती ... सीएलएफ उपकरणे आणि इतर यांत्रिक उपकरणे यांची सर्वसमावेशक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ३९,८७,१००/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| क) | **का.अ., मऔविम, प्रकल्प विभाग, पुणे.** | | | |
| १ | चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २.... भूखंड क्र. PAP-V-१४४ ते PAP-V-१४९/१० च्या दरम्यान पावसाचे पाणी वाहून नेण्याकरीता ६०० मी.मी. व्यासाचे RCC पाईप पुरविणे व जोडणे. | ९,२४,९२०/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| ड) | **का.अ., मऔविम, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर** | | | |
| १ | कागल-हातकणंगले पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र... रस्ते देखभाल व दुरूस्ती... सांगाव येथील भुखंड क्र. टी - ५३ मधील बंधाऱ्याचे खोलीकरण व रूंदीकरण करणे. | २६,८४,०८२/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| इ) | **का.अ., मऔविम, कोल्हापूर विभागांतर्गत सातारा उपविभाग, सातारा.** | | | |
| १ | सातारा औद्योगिक क्षेत्र... सातारा औद्योगिक क्षेत्रातील पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती व अनिवासी इमारतीची देखभाल दुरूस्ती अंतर्गत प्रादेशिक अधिकारी, उप अभियंता सातारा क्र. १, २ व निवासी इमारती येथील दररोजची साफसफाई करणे. | १०,४२,३५८/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |
| २ | सातारा औद्योगिक क्षेत्र... देखभाल व दुरूस्ती... सातारा औद्योगिक क्षेत्रातील ट्रक टर्मिनस भुखंडावर झाडे लावणे. (जिल्हा उद्योग केंद्र सातारा यांच्या मार्फत) | ७,६०,२८३/- | ०८/०८/२०२५ | २२/०८/२०२५ |

# अजय बनवणार आणखीन एक सिक्वेल ?

पहिल्यांदा
फ्लॉप, मग पुन्हा हिट
आणि आता पुन्हा एकदा फ्लॉप. २०२५ वर्षातील आत्तापर्यंतचे सात महिने अभिनेता अजय देवगणसाठी फार चांगले होते असे म्हणता येणार नाही. यावर्षात आत्तापर्यंत अजयचे तीन चित्रपट प्रदर्शित झाले आहेत: 'आझाद', 'रेड २' आणि 'सन ऑफ सरदार २'. यापैकी आझाद फ्लॉप झाला, तर रेड २ चांगला चालला आणि आता पुन्हा सन ऑफ सरदार २ असफल झाला आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'सन ऑफ सरदार २' पासून अजयला खूप अपेक्षा होत्या. परंतु हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाल्याचे चित्र दिसत आहे. अजयच्या हातामध्ये एकावेळी अनेक प्रोजेक्ट्स असतात. त्यामुळे तो एकापाठोपाठ एक चित्रपटांचे शूटिंग करण्यात आणि त्यांना प्रदर्शित करण्यात व्यस्त असतो. आता सुद्धा 'सन ऑफ सरदार २'च्या अपयशाने खचून न जाता अजय देवगण आपल्या आगामी सिनेमाचे शूटिंग पूर्ण करण्यात व्यस्त आहे, परंतु आपल्या एका २०० कोटींची कमाई केलेल्या चित्रपटाच्या सिक्वेलचा विचार करत असल्याची एक मोठी बातमी हाती आली आहे. हा सिनेमा सिक्वेल असणार आहे की रिमेक? चला जाणून घेऊ या. २०२४ मध्ये विकास बहल दिग्दर्शित अजय देवगणचा 'शैतान' हा सिनेमा प्रदर्शित झाला होता आणि तो यशस्वी देखील झाला होता. या सिनेमामध्ये अजयसह अभिनेता आर. माधवनने सुद्धा काम केले होते. त्याचसोबत अजयच्या मुलीच्या भूमिकेमध्ये जानकी बोडीवालाने काम केले होते. २०२३ साली आलेल्या वश या गुजराती चित्रपटाचा हा रिमेक होता. आता वश चा सिक्वेल 'वश लेव्हल २' या नावाने येत्या २७ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होत आहे. मग अजय देखील 'वश लेव्हल २' चा रिमेक शैतान २ बनणार का? वश मध्ये एका कुटुंबाची कथा दाखवण्यात आली होती, तर वश लेव्हल २ मध्ये विद्यार्थ्यांचे कथानक आहे, आणि हा सिनेमा एकदम ॲक्शन-पॅक सिनेमा असणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अजय देवगण 'शैतान २' बनवण्याचा विचार करत असला तरी 'वश लेव्हल २' प्रदर्शित होण्याची वाट बघत आहे. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर कसा प्रतिसाद मिळतो, हे बघूनच अजय चित्रपटाचे कथानक आणि शूटिंग यासंदर्भात निर्णय घेणार आहे.



# 'यापुढे मी आशासह गाणार नाही' असे किशोर कुमार का म्हणाले ?

**नुकताच ४ ऑगस्ट रोजी किशोर कुमार यांचा जन्मदिन होता. त्यानिमित्ताने आज त्यांचा एक किस्सा शेअर करत आहे.**






साल होते १९७८. रणधीर कपूर व नीतू सिंग यांना घेऊन निर्माता कांत कुमार एक चित्रपट बनवत होते. चित्रपटाचे दिग्दर्शक होते अशोक रॉय. चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी आर.डी. बर्मन यांच्यावर सोपवण्यात आली होती, आणि चित्रपटाची गाणी लिहिण्यासाठी आनंद बक्षी यांची निवड करण्यात आली होती.

या चित्रपटाचे एक ड्युएट गाणे रेकॉर्ड करायचे होते. नायकाला एका अज्ञात ठिकाणी आणल्यानंतर खलनायक मिठाईतून त्याला नशेचे औषध देतो. त्यामुळे खलनायकाच्या गटातील मुली नायकासमोर नृत्य करतात, तेव्हा त्यातील एक मुलगी त्याला आपली प्रेयसी असल्याचा भास होतो, आणि तो तिच्यासह प्रेमगीत गाऊ लागतो. परंतु ती त्याची प्रेयसी नसल्याने व तो नशेमध्ये नसल्यामुळे प्रेमगीत असले तरी त्यात एक तडकभडकपणा अपेक्षित होता. म्हणूनच आर.डी. बर्मन यांनी हे गाणे किशोर कुमार व आशा भोसले यांच्याकडून गाऊन घेण्याचा निर्णय घेतला.

ठरलेल्या दिवशी गाणे रेकॉर्ड करण्यासाठी किशोर कुमार आणि आशा भोसले रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये हजर झाले. गाण्यापूर्वी त्याची रिहर्सल सुरू असताना किशोर कुमार चुकीचे गात आहेत हे आशा भोसले यांच्या लक्षात आले. 'किशोरदा, तुम्ही चुकीचे गात आहात, सूर चुकीचे आहेत,' आशा भोसले यांनी किशोर कुमार यांच्या समक्ष आर. डी. बर्मनना सांगितले.

गाणे चांगले व्हावे याच्यामुळे त्यांनी हे सांगितले. परंतु ही गोष्ट किशोर कुमारना आवडली नाही.

'यापुढे मी आशासह गाणार नाही.' त्यांनी हळूच आर. डी. बर्मनला सांगितले.

रेकॉर्डिंग करायची देखील त्यांची इच्छा नव्हती. परंतु आर. डी. बर्मन यांनी त्यांची समजूत काढली तेव्हा कुठे ते गाणे रेकॉर्ड करण्यासाठी तयार झाले. त्याकाळात गाण्याचे लाइव्ह रेकॉर्डिंग होत असे. त्यामुळे रेकॉर्डिंग रूममध्ये आशा भोसले आणि किशोर कुमार एकमेकांच्या शेजारी आपापल्या माईकसमोर उभे राहिले, दोघांमध्ये कसलीही बातचीत झाली नाही. थोडे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

जेव्हा किशोर कुमार यांनी गायला सुरुवात केली, तेव्हा काही क्षणातच त्यांच्या लक्षात आले की सूर खरोखरच चुकीचे लागत आहेत.

'तु तिकडे कशाला बघत आहेस? सांग ना, मी खराब गात आहे,' किशोर कुमार थोडे दटावत आशा भोसलेंना म्हणाले .

'किशोरदा, तुम्हाला सांगितले तर तुम्ही नाराज होता, आणि नाही सांगितले तर ओरडता.' आशा भोसले यांच्या या बोलण्यावर किशोर कुमार हसू लागले.

'मी असाच आहे, वेडा, पागल,' किशोर कुमार म्हणाले.


त्यावेळी किशोर कुमार यशाच्या शिखरावर होते. ते देशाचे लाडके गायक होते. त्यांची अनेक गाणी तोपर्यंत सुपरहिट झाली होती. काही क्षण त्यांना आशा भोसले यांचे बोलणे आणि चूक दाखवणे आवडले नाही. परंतु नंतर चूक लक्षात आल्यावर त्यांनी मोठ्या मनाने ती कबूल केली.

काहीच मिनिटात किशोर कुमार यांनी गाणे रेकॉर्ड करायची सूचना आर.डी. बर्मनना दिली, आणि ते व आशा भोसले यांनी अशा काही जोशामध्ये ते गाणे रेकॉर्ड केले की चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर हे गाणे जेव्हा सुरु होई, सिनेमागृहातील प्रेक्षक या गाण्यावर नाचू लागतात, शिट्या मारतात आणि पैसे फेकतात.

तो चित्रपट होता 'ढोंगी' आणि ते गाणे होते...

**हाय रे हाय तेरा घुँघटा**
**नींद चुराए तेरा घुँघटा**

हे गाणे ऐकले की, श्रोत्यांचे पाय ठेका धरतात. यूट्युबवर हे गाणे उपलब्ध आहे. हा किस्सा वाचल्यावर ते जरुर ऐका.








# गुलशनचे दु:ख

बॅड मॅन म्हणून संपूर्ण बॉलीवूडमध्ये ओळखला जाणारा खलनायक गुलशन ग्रोवरने आत्तापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये वैविध्यपूर्ण भूमिका केल्या आहेत. गुलशनने आपल्या कारकिर्दीत खूप यश, प्रसिद्धी, पैसा, आणि लोकप्रियता मिळवली. केवळ गुलशन ग्रोवरच नव्हे तर अनेक यशस्वी कलाकारांच्या बाबतीत सर्वसामान्य लोकांचा समज असतो की, प्रत्यक्ष आयुष्यात ते सुखी आहेत. परंतु तसे नसते. गुलशन ग्रोवरच्या बाबतीत सांगायचे झाल्यास, खूप वर्षांनी त्याची आपल्या मुलाशी, संजयशी, भेट झाली आहे. पत्नी फिलोमिना ग्रोवरसह घटस्फोट घेतल्यानंतर त्याला आपल्या मुलापासून दूर जावे लागले होते. अनेक वर्ष तो आपल्या मुलाला भेटू देखील शकला नव्हता. परंतु आता गुलशन आणि संजय एकत्र आले आहेत. गुलशनने सांगितले की, मला आता खूप एकटेपण वाटते. मला आता कुटुंबासह राहायची इच्छा आहे. त्यामुळे एक दिवस मी संजय आणि माझी घटस्फोटित पत्नी फिलोमिनाशी याविषयी चर्चा केली. त्यानंतर मी आणि संजय एका घरामध्ये राहू लागलो. माझ्या डुप्लेक्स घराच्या वरच्या भागामध्ये संजय राहतो आणि मी खालच्या भागामध्ये. संजयला माझ्या घरी येण्याचे स्वातंत्र्य आहे, पण मी तेव्हाच त्याच्या घरी जाऊ शकतो, जेव्हा तो मला निमंत्रण देतो. संजय ग्रोवरने आता एका चित्रपटाची निर्मिती केली आहे. यापूर्वी त्याने हॉलीवूडमध्ये सृजनशील कार्यकारी म्हणून काम केले आहे. गुलशन ग्रोवरने १९९८ मध्ये फिलोमिनाशी विवाह केला होता आणि त्या विवाहापासून त्याला संजय हा मुलगा आहे. २००१ मध्ये गुलशन आणि फिलोमिना यांचा घटस्फोट झाला होता. त्याच वर्षी गुलशन ग्रोवरने कशिश ग्रोवरसह दुसरा विवाह केला होता, परंतु हा विवाह सुध्दा अयशस्वी ठरला.



# सैयारा मध्ये सिद्धार्थ कियारा?

अहान पांडे आणि अनित पड्डा अभिनीत 'सैयारा' चा डंका सध्या वाजवला जात आहे. निर्मात्याच्या मते, या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर यशाचे रेकॉर्ड निर्माण केले असून आत्तापर्यंत ३०० कोटींची कमाई केली आहे. एके ठिकाणी अहान पांडेच्या जुन्या व्हिडिओवर, ज्यामध्ये तो शाहरुख खान आणि रणबीर कपूर यांची नक्कल करत आहे, ते पाहून युजर्स अहानला ट्रोल करत आहेत. तर दुसरीकडे, या सिनेमाच्या हास्यास्पद प्रमोशनची खिल्ली उडवली जात आहे. परंतु तुम्हाला माहिती आहे का की, या सिनेमातील नायक-नायिकेच्या भूमिकांसाठी सुरुवातीला अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री कियारा अडवाणी यांची निवड करण्यात आली होती? मग का नाही या दोघांनी सैयारा मध्ये काम केले नाही? सूत्रांच्या बातमीनुसार, या चित्रपटासाठी सिद्धार्थ आणि कियाराला विचारण्यात आले होते, परंतु काही कारणांनी दोघांनी हा चित्रपट करण्यास नकार दिला होता. त्यानंतर यशराज फिल्म्स युनिवर्सचा सर्वेसर्वा आदित्य चोप्रा आणि दिग्दर्शक मोहित सूरी यांनी नव्या कलाकारांसह हा सिनेमा बनवण्याचा निर्णय घेतला आणि अहान पांडे व अनित पड्डा या दोघांची निवड केली होती.



# रजनीकांतना हवा आहे नागार्जुनकडून सल्ला




फक्त दाक्षिणात्य चित्रपटांचा सुपरस्टार व लोकप्रिय अभिनेता नव्हे तर भारतीय चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार थलाईवा रजनीकांत लवकरच प्रदर्शित होणाऱ्या आपल्या नव्या मल्टीस्टारर चित्रपट 'कुली' च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. कुलीमध्ये रजनीकांत आणि नागार्जुन एकत्र दिसणार आहेत. या सिनेमाच्या नुकत्याच आयोजित केलेल्या एका प्रमोशनदरम्यान रजनीकांत यांनी थट्टेमध्ये असे काही वक्तव्य केले की, नागार्जुन थोडा असुरक्षित झाल्याचे दिसले. रजनीकांत म्हणाले की, कसे ७४ व्या वर्षी माझ्या डोक्यावरील केस झडले आहेत आणि दुसरीकडे नागार्जुन आहे, जो आजही तरुण आणि फिट दिसतो. मला जाणून घ्यायचे आहे की, नागार्जुनच्या तरुण आणि फिट दिसण्यामागे काय रहस्य आहे? मी त्याच्यासह ३३ वर्षांपूर्वी देखील काम केले होते. तेव्हा तो वयापेक्षा अधिक तरुण दिसत होता. आता माझे सर्व केस झडले आहेत. पण नागार्जुन आपली त्वचा आणि शरीराची भरपूर काळजी घेतो. 'हे बोलल्यावर रजनीकांत यांनी नागार्जुनला त्याच्या या तरुण दिसण्याचे रहस्य काय असा प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना नागार्जुनने सांगितले की, 'मी व्यायाम व खाण्यापिण्याला महत्त्व देतो.' कुलीमध्ये नागार्जुन खलनायकाची भूमिका करत असून त्याच्या व्यक्तिरेखेचे नाव सायमन आहे. नागार्जुनची प्रशंसा करत रजनीकांत यांनी सांगितले की, 'माझ्या अभिनय कारकिर्दीत मी अनेकदा खलनायकाची भूमिका केली आहे, त्याने आत्तापर्यंत नायकाच्या भूमिका केल्या आहेत. परंतु मला वाटतं की सायमनप्रमाणे मी अभिनय करू शकलो असतो.' नागार्जुन केवळ पैशांसाठी काम करणारा अभिनेता नाही. त्याला याची गरजही नाही.

कुली मध्ये रजनीकांत, नागार्जुन अक्किनेनी, सौबिन शाहीर, उपेंद्र, श्रुती हासन, सत्यराज आणि आमिर खान सारखे नामवंत कलाकार असून हा सिनेमा येत्या १४ ऑगस्टला प्रदर्शित होत आहे.

# वॉर २ चे अनोखे प्रमोशन

सुपरस्टार ऋतिक रोशन आणि ज्युनिअर एनटीआर यांचा बहुचर्चित चित्रपट वॉर २ येत्या १४ ऑगस्टला प्रदर्शित होत आहे. या दोन्ही कलाकारांचे चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट बघत आहेत, कारण या दोन्ही अभिनेत्यांनी पहिल्यांदाच एकमेकांसह काम केले आहे. या स्पाय विषयावर आधारित या जबरदस्त क्शन चित्रपटाचे प्रमोशन ऋतिक व ज्युनिअर एनटीआर यांनी सुरु केले आहे. अशातच काल ऋतिक रोशनच्या घराबाहेर एक बिलबोर्ड ट्रक बघायला मिळाला.

ऋतिकने काल आपल्या इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत आपला एक फोटो चाहत्यांपर्यंत पोहचवला आहे. या फोटोमध्ये दिसत आहे की, ऋतिकच्या पाठी रस्त्यावर एक बिलबोर्ड ट्रक दिसत आहे. त्यावर असलेल्या बोर्डावर ज्युनिअर एनटीआरचा एक फोटो लावला आहे आणि लिहिले आहे की, 'घुंघरू टूट जाएंगे पर हमसे ये वॉर जीत नहीं पाओगे. **#NTTR VS Hritik'.** (पैंजण तुटतील परंतु माझ्याशी ही लढाई जिंकू शकणार नाहीस. एनटीआर विरुद्ध ऋतिक) या फोटोखाली ऋतिकने लिहिले आहे की, 'अच्छा ज्युनिअर एनटीआर, माझ्या घराच्या खाली हा बिलबोर्ड पाठवून आता तू खूप पुढे आला आहेस. मी हे आव्हान स्वीकारले आहे. लक्षात ठेव की, तू हे आमंत्रण दिले होतेस.' अर्थात हा चित्रपटाचा प्रमोशन स्टंट असून त्याद्वारे लक्षात येत आहे की, 'वॉर २' मध्ये देखील प्रेक्षकांना या दोन कलाकारांची टसल पहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटातील नवे रोमँटिक गाणे 'आवान-जावान' प्रदर्शित करण्यात आले असून त्यामध्ये ऋतिक रोशन आणि कियारा अडवाणीची जबरदस्त केमिस्ट्री दिसून येत आहे.








# 'ॲनिमल' ने केली माझ्या चित्रपटाची कॉपी...

दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा जितके आपल्या चित्रपटांसाठी चर्चेमध्ये असतात, त्याहीपेक्षा अधिक वादामध्ये असतात. दीपिका पदुकोणसोबतचा त्यांचा वाद अद्याप सुरू असतानाच त्यांच्यावर आता चित्रपटाची कॉपी करण्याचा आरोप लावला गेला आहे. कुणी हा आरोप लावला? कुठल्या चित्रपटाची कॉपी वांगांनी केली? २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या संदीप रेड्डी वांगा यांच्या 'ॲनिमल' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर भरपूर कमाई केली होती. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना आणि बॉबी देओल असलेल्या या सिनेमावर गीतकार जावेद अख्तरसारख्या मान्यवरांनी टीका केली आहे. काहीजणांना हा चित्रपट आवडला तर काहीजणांना या सिनेमाचा विषय टॉक्सिक वाटला. पण आता दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी अक्षय कुमार अभिनित आपल्या 'जानवर' या चित्रपटाची कॉपी करून संदीप रेड्डी वांगा यांनी 'ॲनिमल' बनवला असा आरोप केला आहे. १९९९ साली म्हणजे तब्बल २६ वर्षांपूर्वी अक्षय कुमारला घेऊन सुनील दर्शन यांनी 'जानवर' हा सिनेमा बनवला होता. या चित्रपटाने त्यावर्षी सर्वात अधिक कमाई केली होती. एका मुलाखतीदरम्यान सुनील दर्शनना जेव्हा हा प्रश्न विचारला गेला की, तुमच्या कुठल्या सिनेमाचा रिमेक बनवायला तुम्हाला आवडेल? तेव्हा या प्रश्नाचे उत्तर देताना सुनील दर्शन यांनी सांगितले की, मी कसा बनवू रिमेक? माझ्या चित्रपटाची नक्कल आतापर्यंत अनेकांनी केली आहे. माझा एक चित्रपट होता 'जानवर' नावाचा. इंग्रजीमध्ये जानवरला काय म्हणतात? त्याची कथा काय आहे? 'ॲनिमल' सर्वांनी बघितला आहे ना? पण मी दावा करत नाही की माझ्या चित्रपटाची कॉपी केली आहे. कारण त्या दिग्दर्शकाचे सादरीकरण वेगळे आणि चांगले होते. परंतु ॲनिमलच्या निर्मात्याने कबूल केले असते की, जानवराची नक्कल आहे ॲनिमल, तर बरे झाले असते. त्यामुळे गप्प राहणे योग्य आहे असे मला वाटले. कारण अन्य काही लोकांनी देखील माझ्या सिनेमाची नक्कल केली आहे आणि ते हिट झाले आहेत. वाचकांच्या माहितीसाठी इथे उल्लेख करत आहोत की, 'जानवर' या सिनेमामध्ये अक्षय कुमारने बाबू ही व्यक्तिरेखा साकार केली होती. एक अनाथ मुलगा गुन्हेगारीच्या जगात काम करायला लागतो, पण नंतर एका घटनेमुळे त्यातून बाहेर पडून एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करतो. तर 'ॲनिमल' मध्ये रणबीर कपूरने रणविजय नावाच्या एका हिंसक व्यक्तीची भूमिका केली आहे. आपल्या वडिलांचे प्रेम मिळवण्यासाठी आणि लक्ष केंद्रीत करण्यासाठी तो कुठलीही हद्द पार करायला मागे पुढे बघत नाही. या चित्रपटामध्ये ॲक्शन आणि इमोशन यांचे उत्तम मिश्रण पहायला मिळाले आहे. आता 'जानवर' आणि 'ॲनिमल' हे दोन्ही ॲक्शन चित्रपट असले तरी वांगानी जानवरची कॉपी केली आहे या सुनील दर्शन यांच्या दाव्याशी तुम्ही सहमत आहात का?

# नवाकाळ शब्दकोडे-१३३५



**आडवे शब्द –** २. पादत्राणाचा सुटसुटीत प्रकार ४. रुखरुख ८. अचानक झालेला लाभ, एक शुभ योग १०. उकडलेल्या बटाट्याचा हा पदार्थ पाणीपुरीच्या गाडीवर मिळतो. १२. वागणूक १३. विवाह १५. रानरेडा १७. सत्कर्म, परोपकार १८. त्वचा १९. विकत घेणे २०. चिन्ह २१. कंटक २३. इंद्राचा हत्ती २४. भाग्य, प्रारब्ध २५. बोध, आकलन २६. धष्टपुष्ट २७. फुटपाथवरचे दुकान-पथारी २८. खरे, ऋत २९. घोड्याची मादी ३०. जेव्हा, ज्या वेळी ३२. तिरळा ३३. फुलाची पाकळी ३४. मुख, वदन ३६. मतभेदयुक्त चर्चा ३९. चतुर्थ श्रेणी कर्मचारी ४१. हळुवारपणे ४३. सौम्य धोरण ४६. रात्र, रजनी ४७. पूर्वी या फळासाठी काश्मीर प्रसिद्ध होते. ४८. कर्नाटकचा जोग धबधबा या नदीवर आहे. ४९. दाणेदार ५१. आंदोलन ५२. उंची बांगडी ५६. योजना, मनसुबा ५७. पलटण, तुकडी ५९. रामनवमीला येणारी सुगंधी वनस्पती ६०. आदबशीर ६३. मौज, बहार ६४. कर्ण ६५. लाडिक ६७. किंमत, मूल्य ६८. दृष्टिक्षेप ७०. चांदी ७२. मुलीच्या नाकातला दागिना ७३. मुलाची-मुलीची मुलगी ७५. कौशल्य ७७. रानात पसरलेली आग ७९. पिता, बाप ८१. बिछाना ८२. ओझे, वजन ८३. गणपतीच्या पूजेतील वनस्पती ८४. सिद्धता, सज्जता ८६. पदवी, सनद, हिंदीत पुस्तक ८८. राणा प्रतापचा घोडा ९०. पुत्री, तनया ९२. शोभिवंत मांडणी, सजावट ९४. पुराणा ९५. गरीब स्वभावाचा, निरुपद्रवी ९७. यासाठी, म्हणून ९८. दरोडा १००. श्रीराम १०२. बांधला गेलेला १०३. असहाय, शक्तिहीन १०४. तरुण, युवा १०६. चतकोर १०८. डोके, शिर १०९. कुवतीनुसार, शक्य असेल तसे ११०. लवण १११. आतिथ्य, सरबराई

**उभे शब्द –** १. प्रचलित २. पिठाची गिरणी ३. सुंदर स्त्री, रूपवती ४. झलक ५. एकाच दिशेने बघत राहणे ६. डाक, पोस्टाने आलेले पत्र ७. सर्वाधिक महत्त्व, प्राधान्य ८. मोठा हातोडा ९. कच खाणे १०. अतिशय (प्रयत्न) ११. कुंकवाचा टिळा १४. हेळसांड, दुर्लक्ष १६. वक्र १७. गल्ली, मोहल्ला १८. प्रामाणिक २०. होऊन गेलेले २२. नीटनेटकेपणा २४. राक्षस २५. झेप २८. अखंड, मध्ये न तुटता २९. वय खूप वाढलेला उपवर ३१. हक्क, अधिकार ३२. काळा-तांबडा भोपळा, गंगाफळ, चक्की ३३. चिखल, राडा ३५. बायको ३७. नीलकंठ पक्ष्याचे दुसरे नाव ३८. इच्छा, आस ३९. पैशांची टंचाई, नड ४०. आडदांड माणूस ४१. चकित ४२. रामाचे वडील ४४. आवड, छंद, मदनाची स्त्री ४५. ईर्ष्या, चुरस ५०. बाष्प ५३. मुंडण ५४. कोकण व गोव्यातले प्रसिद्ध दैवत ५५. गुळाची ढेप ५६. त्रस्त, त्रासलेला ५८. सुती कापड छपाईचा हस्तव्यवसाय ५९. औषध ६०. मेव्हणा ६१. भाग्य, प्राक्तन ६२. कशीतरी, घाईघाईने उरकलेली गोष्ट याअर्थी वाक्प्रचार ६४. त्वचा ६६. वाहनात सामान ठेवण्याची जागा ६९. अगदी अल्प काळ ७१. सलगी ७४. युवती ७६. सूर्याचे एक नाव ७८. कंडक्टर ८०. वाईट सवय ८१. उदी ८५. श्रीकृष्णाचे कुळ ८६. तीर, काठ ८७. आचारी ८९. पुरश्चरण ९१. कोर्ट ९२. वृक्ष, बाग ९३. शिंपण ९५. असहाय स्त्री ९६. धोक्याचे ९९. फणसाचा प्रकार १०१. वंश, कुल १०३. हात, कर १०४. शक्कल १०५. थोडे १०७. चरबी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३४चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. चलती ४. सहमती ७. श्यामसुंदर ११. रूपगर्विता १४. सकाम १६. भगवान १८. मत १९. तरतरीत २२. मलई २४. वनचर २५. सिंह २६. डगला २८. षष्ठी २९. कुल ३०. गौण ३१. चहा ३२. मोफत ३३. काणा ३४. आच ३५. वाखाणणी ३७. वचा ३८. वाडी ३९. अपराध ४१. नेता ४२. फारकत ४५. दाई ४६. चपलाहार ४८. रटाळ ५०. श्रुतिका ५३. क्षार ५५. उडीद ५७. काटा काढणे ६०. चटक ६२. बंदर ६३. मूल ६४. डबर ६६. बाग ६७. सधन ६९. गळपट्टा ७०. नीड ७३. गहन ७४. तुटवडा ७७. कष्टाळू ७८. निरंजन ८०. शिफारस ८२. पथभ्रष्ट ८४. ताग ८५. शीर्षासन ८६. नलिन ८८. तूस ८९. मंगल ९१. सामोपचार ९२. नाच ९३. तागा ९५. भीमाशंकर ९८. वारू १००. भाल १०२. रीत १०३. कात्री १०५. मोहन १०६. सहोदर १०७. क्षत १०८. नूपुर १०९. आज्ञाधारक

**उभे शब्द** : १. ढेप २. चर्वितचर्वण ३. लता ५. हजेरी ६. लस ७. श्यामल ८. सुंभ ९. दगड १०. रवा ११. रूढी १२. गमन १३. नरसिंहवतार १५. कामला १७. नकुल २०. तह २१. तडफदार २३. ईषणा २४. वडवा २७. गत २९. कुचराई ३३. काडी ३४. आपदा ३६. खात्रीलायक ३८. वात ४०. पाचपोच ४२. फाळ ४३. करडी ४४. प्रतिकार ४७. रक्षाबंधन ४९. टाळे ५१. काटा ५२. लेणे ५४. रदन ५५. उलगडा ५६. दडपण ५८. काबाडकष्ट ५९. ढग ६१. टग्या ६५. बट्टा ६७. सहनशीलता ६८. स्वेटर ७१. कळूनसवरून ७३. गज ७४. तुफान ७५. वसन ७६. पंथ ७९. रंगमंच ८०. शिसव ८१. सान ८२. परमोच्च ८३. भ्रष्टाचार ८७. लिपिक ९०. तमारी ९२. नापास ९४. गाभा ९६. शंतनू ९७. रकार ९८. वाहक ९९. मोद १०१. लक्ष १०४. प्राज्ञा १०५. मोर

# एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे दिल्लीत

पान १ वरून

ठाकरेंना नाव न घेता टोलाही मारला. ते म्हणाले की, मी जाहीरपणे खासदारांसोबत भेटत आहे. मी लपून छपून काही काम करत नाही. मी जे करतो ते सगळ्यांसमोर करतो.

अमित शहा यांची भेट झाल्यानंतर दुपारच्या सुमारास शिंदे यांनी पंतप्रधान मोदी यांचीही भेट घेतली. शहा आणि मोदी यांच्या भेटीत महाराष्ट्रातील वाग्रस्त मंत्र्यांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे.

शिंदे दिल्लीत असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हेही आजपासून ३ दिवस दिल्ली दौऱ्यावर आहेत. दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास दिल्ली विमानतळावर त्यांचे आगमन झाले. त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी खासदार संजय राऊत, खा. अरविंद सावंत, खा. संजय दिना पाटील, खा. अनिल देसाई उपस्थित होते. दिल्ली विमानतळावरून खा. संजय राऊत यांच्या निवासस्थानी गेले. संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट झाली. उद्या सकाळी १० वाजता संजय राऊत यांच्या निवासस्थानी त्याची पत्रकार परिषद होणार आहे. त्यानंतर ते आपल्या पक्षाच्या खासदारांशी संवाद साधणार आहेत. दुपारी ते दिल्लीतील काही नेत्यांच्या भेटीगाठी घेणार आहेत. संध्याकाळी ते राहुल गांधींनी आपल्या निवासस्थानी आयोजित केलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीला हजर राहणार आहेत. या दिल्ली दौऱ्यात आमदार आदित्य ठाकरे हेदेखील उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहेत.

विशेष म्हणजे, उद्धव ठाकरे यांचा उबाठा आणि राज ठाकरेंच्या मनसे यांची युती होण्याची जोरदार चर्चा सुरू आहे. मनसेबरोबर युती झाली, तर उबाठा इंडिया आघाडीत राहाणार का, की मनसे इंडियात येणार, असे प्रश्न उपस्थित केले जात आहे. त्यामुळे उद्याच्या इंडिया आघाडीच्या बैठकीत मनसेची चर्चा होणार का, याबद्दल उत्सुकता आहे.

# राज ठाकरेंना कडूंच्या कर्जमाफी यात्रेचे आमंत्रण

पान १ वरून

म्हटले की, आम्ही राज ठाकरेंना यवतमाळमध्ये होणाऱ्या कर्जमाफी यात्रेला आमंत्रित केले असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर, आगामी आंदोलनाच्या दिशादर्शक मागण्यांवर आणि धोरणांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांसाठी असलेले हे आंदोलन केवळ बच्चू कडू यांच्या नावापुरते न ठेवता हे शेतकऱ्यांसाठी असलेले आंदोलन म्हणून कसे पुढे जाईल, असा आमचा प्रयत्न आहे. मी मोठे होणे हा महत्त्वाचा विषय नाही. शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. सरकार त्यांची टिंगल करत आहे, हे अतिशय चुकीचे आहे. दुष्काळ पडला तर कर्जमाफी जाहीर करू, असे देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत. म्हणजे दुष्काळ पडायची वाट शेतकऱ्यांनी पाहावी का? शेतमालाला भाव मिळत नाही, हे दुष्काळापेक्षा जास्त मोठे नुकसान आहे. मागील दोन वर्षांपासून भाव मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. हा विषय फडणवीस यांच्या लक्षात यावा यासाठी आंदोलन सुरू आहे.

या भेटीवेळी मनसे नेते बाळा नांदगावकर हेही उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, बच्चू कडूंच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी राज ठाकरे यांनी आम्हाला पाठवले होते. चक्काजाम आंदोलनालाही आमचा पाठिंबा होता. शेतकऱ्यांबाबत राज ठाकरे संवेदनशील आहेत.

# आयएएस तुकाराम मुंढेंची २३ वी बदली

पान १ वरून – काम करताना हा एक वेगळ्या प्रकारे विक्रमच असल्याचे सांगितले जात आहे.तुकाराम मुंढे ज्या ठिकाणी जातात त्या ठिकाणच्या प्रशासनाला, कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात.सरकारी कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याचा फटका बसतो.

महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय ते काम करतात.मुंढे यांच्यासह नितीन पाटील, अभय महाजन,ओंकार पवार आणि आशा खान यांच्याही संबधित पदावरून दुसऱ्या विभागात बदल्या करण्यात आल्या आहेत.

**PUBLIC NOTICE**

Late Smt. Maya Vinod Thakkar Member of the Maryland Apartments Co-operative Housing Society Ltd. having address at Sion Trombay Chembur, Mumbai - 400 071 and holding Shop No: E-13 of the society, died on 04-07-2024. The Society hereby invites claims and objections from the heir or heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society Shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/with the Secretary of the Society between 10 A.M to 4 P.M from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Chembur
Date: 07-08-2025 Sd/-
For and on behalf of MaryLand Co-operative Housing Society Ltd
Hon Secretary

**PUBLIC NOTICE**

Late Smt. Maya Vinod Thakkar Member of the Maryland Apartments Co-operative Housing Society Ltd. having address at Sion Trombay Chembur, Mumbai - 400 071 and holding Shop No: E-08 of the society, died on 04-07-2024. The Society hereby invites claims and objections from the heir or heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society Shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/with the Secretary of the Society between 10 A.M to 4 P.M from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Chembur
Date: 07-08-2025 Sd/-
For and on behalf of MaryLand Co-operative Housing Society Ltd
Hon Secretary

# माधुरीला नांदणीला पाठवण्यासाठी वनताराचीही सहकार्याची तयारी

पान १ वरून

मला सांगितले की, आम्ही केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन केले. महादेवी हत्तीणीचा ताबा घेण्याचा आमचा कोणताही प्रयत्न नव्हता. नांदणी मठाजवळ वन विभागाने निवडलेल्या जागेवर या हत्तीणीसाठी पुनर्वसन केंद्र उभारण्यास राज्य सरकारला सर्वतोपरी मदत करण्याची तयारी सुद्धा वनताराने दर्शविली आहे.

## नांदणीत पुनर्वसन केंद्र! वनताराची तयारी

पान १ वरून

न्यायालयासमोर केलेल्या कायदेशीर अर्जास वनतारा पूर्ण पाठिंबा देईल. न्यायालयाच्या मान्यतेनुसार वनतारा तिच्या सुरक्षित आणि सन्मान्य परतीसाठी संपूर्ण तांत्रिक आणि पशुवैद्यकीय सहाय्य प्रदान करेल. मठ आणि राज्य सरकारशी समन्वय साधून कोल्हापूर नजीकच्या नांदणी परिसरात वनतारा माधुरीसाठी दूरस्थ पुनर्वसन केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव वनताराने मांडला आहे. या प्रस्तावित केंद्रामध्ये वेगवेगळ्या सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील.

# उत्तरकाशीमध्ये अडकलेले महाराष्ट्राचे ५१ पर्यटक सुखरूप! मृतांचा आकडा ५

पान १ वरून

चिखल-गाळ जमा झाला आहे. मी आज तेथे जाऊन लोकांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला आणि संपूर्ण घटनेची माहिती घेतली. या आपत्तीत सर्वकाही नष्ट झाले आहे.संध्याकाळपर्यंत लष्कराच्या जवानांनी सुमारे १९० लोकांचा बचाव करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले . सध्या बचावकार्य सुरू आहे आणि त्यांना उत्तरकाशीमध्ये आणले जात आहे.

संपूर्ण जोडरस्ता अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे पूर्णतः बाधित झाला आहे.सरकार त्याची व्यवस्था करण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. पंतप्रधानांनीही शक्य त्या सर्व मदतीचे आश्वासन दिले आहे.

ही घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या सुमितने सांगितले की ,या आपत्तीने लोकांना पळून जाण्याची संधीसुद्धा मिळाली नाही. अनेक लोक बेपत्ता आहेत आणि कदाचित त्यांचा मृत्यू झाला असावा.

# कबुतरखान्याबाबत जैन आक्रमक

पान १ वरून

आच्छादन हटवून तेथे ठिय्याच मांडला. आंदोलकांनी सोबत आणलेले दाणे कबुतरांना टाकत पालिका कारवाईचा विरोध केला. यावेळी जैन बांधव आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. जैन आंदोलकांनी कबुतरखाना परिसरात जियो और जिने दो, अशी घोषणाबाजीही केली. हे आंदोलन तासभर सुरू होते. त्यामुळे या भागातील वाहतूक विस्कळीत झाली होती.

या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकीकडे आस्था व लोकभावना आहे. तर दुसरीकडे लोकांचे आरोग्य आहे. या दोघांची सांगड घालावी लागेल. कोणाच्याही आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, असा मार्ग काढण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. आम्हाला सुचलेले काही मार्ग आम्ही न्यायालयासमोर मांडणार आहोत.

मुंबई पालिका आयुक्त भूषण गगराणी म्हणाले की, न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत कबुतरखान्यावरील आच्छादन काढता येणार नाही. न्यायालयापुढील सुनावणीसाठी काही निरीक्षणे नोंदवणे आवश्यक आहे. त्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत पालिकेला सध्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या आंदोलनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की,आज कबुतरखाना परिसरात जे झाले ते चुकीचे होते. कायदा हातात न घेता मुंबईकरांनी शांतता राखावी. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पर्यायी उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यासंदर्भात जैन समाजाच्या ट्रस्ट प्रतिनिधींशी चर्चा केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या आंदोलनात बाहेरचे लोक आले होते. आमचा आंदोलनाशी संबंध नाही. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयाबद्दल ट्रस्टने समाधान व्यक्त केले होते. त्यांनी आपली बैठक पुढे ढकलली होती.

मनसे नेते अविनाश जाधव म्हणाले की, शांतप्रिय जैन समाज जर आक्रमक झाला आहे. त्यामागे राजकीय पाठबळ असण्याची शक्यता आहे. कबुतरखाना विषयावर ते आक्रमक होत असतील तर माधुरी हत्तीणीला आणण्यासाठी आम्हीही हिंसक आंदोलन करायचे का? कबुतरांमुळे दम्याचा आजार होतो, असे अनेक डॉक्टर सांगतात. त्यामुळे लोकवस्तीपासून दूर अंतरावर कबुतरखाना सुरू करावा आणि धर्म निभावावा. माधुरी हत्तीण किंवा कबुतरखाना दोन्ही विषय न्यायप्रविष्ट आहेत. या दोन्ही प्रकरणात सर्वोच्च न्यायलयाने भूमिका मांडावी.

मनसे नेते बाळा नांदगावकर म्हणाले की, कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सामान्य जनतेच्या भावना लक्षात घ्याव्या. तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबई परिसरात अनेक वर्षांपासून अनेक कबुतरखाने आहेत. कबुतरांच्या विष्ठेमुळे आजार उद्भवतात असे काहींचे म्हणणे आहे. अखेरीस न्यायव्यवस्था सर्वोच्च आहे. पण जनतेच्या मनात काय आहे हेही महत्त्वाचे आहे. ही राजकारणाची बाब नसून माणुसकीच्या नात्याने विचार केला पाहिजे. पक्षी-प्राण्यांवर प्रेम दाखवणे, ही आपली परंपरा आहे.

P.J. No FC/CR7/ 237/ 2025
Date: 25/07/2025
Exh. 14

**NOTICE**
**IN THE FAMILY COURT NO.7 MUMBAI AT BANDRA PETITION NO.D-36/2024**

Mr. Sultan Mohammed Patel ...Petitioner
V/s
Mrs. Pallavi Sameer Naik ...Respondent

To,
Mrs. Pallavi Sameer Naik ....Co-Respondent
604, B wing, 64 Subham CHS,
Twin Towers, Tilak Nagar,
Chembur, Mumbai 400089.

TAKE NOTICE THAT the Petitioner above named has filed petition against you for divorce U/s c. 7 (b) of GUARDIAN AND WARD ACT, 1890, & U/SEC. 357 OF MOHAMMEDAN LAW FOR THE THE CUSTODY OF CHILDREN, AND U/Sec. 7 (g) OF THE FAMILY COURTS.

TAKE FURTHER NOTICE that, the petition is fixed for hearing and final disposal on **25th August, 2025 at 11:00 a.m.** [Sharp] **in Family Court No.07, Mumbai at Bandra,** or before any other Hon'ble Family Judge, presiding in the Family Court Mumbai at Bandra, assigned charge of the said Court No.7, when you are required to appear in person and file your Written Statement and in default of your doing so, the Hon'ble Judge-Family Court No.7 will proceed to hear the said Petition, against you exparte and pronounce Judgment thereon;

THIS NOTICE IS ORDERED by Shri S. B. Ingulkar, Judge, Court No. 7 on 09.06.2025
GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THIS COURT DATED THIS 26th day of July, 2025

Sd/-
Deputy Registrar,
Family Court Mumbai,
Bandra Kurla Complex,
Bandra [East], Mumbai-400 051

SEAL

**युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई**
( नोंदणी क्र. बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१. दूरध्वनी क्र. २२६२९४८४, ३५११४२४६/५२
WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com /
Website : unionbankcreditsociety.com/ Play store : UBI CR SOCIETY

**५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
**(फक्त सभासदांसाठी)**

**युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.** संस्थेची **सन २०२४-२५** या वर्षाची **५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी सायं ठीक ४:३० वाजता रामा अ‍ॅण्ड सुंदरी वाटुमूल ऑडिटोरीयम, किशनचंद चेलाराम कॉलेज (के. सी. कॉलेज), दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई - २०** येथे आयोजित करण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय सुची**

१. दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२४-२०२५ या वर्षाचा अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक स्वीकृत करणे.
४. सन २०२४-२०२५ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
५. सन २०२४-२०२५ यावर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२५ २०२६ वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
७. सन २०२५-२०२६ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८. कर्जवितरण धोरणास मंजूरी देणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरून,
सही/-
**(प्रशांत सं. सुर्वे)**
**मानद् सचिव**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६/०८/२०२५.

**सूचना :-**
१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न असल्यास ते दि.१६/०८/२०२५ पर्यंत लेखी स्वरुपात आणून देणे.
३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर व वॉट्स ॲपद्वारे उपलब्ध होतील.
४. उपविधी क्र. ग. १.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत स्विकारावा अन्यथा संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. २०२१-२२, २०२२-२३ सालातील लाभांश अद्याप घेतला नसल्यास ३१ डिसेंबर, २०२५ पुर्वी संस्थेत संपर्क करावा.

**२०२५-२६ सालाचे सभासद सहकार प्रशिक्षण हे वार्षिक सभेच्या ठिकाणी दुपारी ३:४५ वाजता आयोजित केले आहे.**

# नवा काळ

• पुणे । गुरुवार ७ ऑगस्ट, २०२५ • पान -८



## पंतप्रधान मोदींच्या हस्ते कर्तव्य भवनचे उद्घाटन




**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीतील कर्तव्य पथावर उभारण्यात आलेल्या कर्तव्य भवन-०३ या नव्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. ही इमारत सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. कॉमन सेंट्रल सेक्रेटरीएट अंतर्गत उभारल्या जाणाऱ्या १० इमारतींपैकी ही पहिली पूर्ण झालेली इमारत आहे. या इमारतीत गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्रालय, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय तसेच प्रमुख वैज्ञानिक सल्लागार यांची कार्यालये असतील.

## राज्यात इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात पहिली आणि दुसरीला एकच कविता

■ नागपूर




**पहिली** आणि दुसरी इयत्तेच्या इंग्रजी विषयाच्या पुस्तकात एकच कविता असल्याने महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळानेभोंगळ कारभार समोर आला आहे.

यंदा शैक्षणिक वर्षासाठी छापण्यात आलेल्या इयत्ता पहिली आणि इयत्ता दुसरीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकांमध्ये बर्ड्स कॅन फ्लाय ही कविता समाविष्ट करण्यात आली आहे. पहिलीच्या पुस्तकात ही कविता पान क्रमांक २८ वर आहे. तर दुसरीच्या पुस्तकात हीच कविता पान क्रमांक १६ वर आहे. विशेष म्हणजे कवितेतील सर्व शब्द जसेच्या तसे असून फक्त चित्र आणि रंगसंगतीत बदल करण्यात आला आहे. प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम समित्या नियुक्त केल्या जातात. त्या शैक्षणिक दर्जा, वयोगटानुसार समजुतीची पातळी आणि भाषिक प्रगती लक्षात घेऊन धडे आणि कविता निवडतात.

## दिवाण हौसिंगच्या वाधवानचा जामीन सुप्रीम कोर्टाने रद्द केला

■ नवी दिल्ली

**३४ हजार** कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी दिवाण हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएचएफएल) माजी प्रवर्तक धीरज वाधवान यांना दिलेला जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला असून त्यांना शरण येण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

दिल्ली उच्च न्यायालयाने धीरज वाधवान यांची प्रकृतीच्या कारणास्तव सप्टेंबर महिन्यात जामिनावर मुक्तता केली होती. दिल्ली उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. संजय कुमार आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमो या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च

**३४ हजार कोटींचा कर्ज घोटाळा**

न्यायालयाचा तो आदेश रद्द करून वाधवान यांचा जामीन रद्द केला. गेल्या मे महिन्यात न्यायालयाने वाधवान यांच्या प्रकृतीची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय समिती नेमली होती. या समितीने वाधवान यांची प्रकृत्ती ठणठणीत असल्याचा अहवाल दिला होता.

## वांद्रे रेक्लेमेन्शनमध्ये उभारण्यात येणाऱ्या अदानींच्या प्रकल्पाला पालिकेचा पाठिंबा

■ मुंबई

**वांद्रे** रेक्लेमेन्शन येथील २८ एकर जमिनीवर अदानी समुहाकडून उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पाला मुंबई पालिकेने आपला संपूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. पालिकेने न्यायालयात हा प्रकल्प किनारपट्टी नियंत्रण कक्ष अर्थात सीआरझेडच्या कक्षेबाहेर असल्याचे म्हटले आहे.

मुंबई महानगरपालिकेने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, अण्णा विद्यापीठ चेन्नईच्या अहवालावर अवलंबून आहोत. या अहवालात हा प्रकल्प सीआरझेडच्या कक्षेबाहेर असल्याचे म्हटले आहे. हा प्रकल्प पालिकेचा सीमांकन योजना व एच पश्चिम विभागाच्या विकास प्रकल्पाचे सहाय्यक इंजिनियरच्या टिप्पणीमध्येही ही बाब नोंदवण्यात आली आहे. अदानींच्या या प्रकल्पाविरोधात सामाजिक कार्यकर्ते झोरु भाथेना व वांद्रे रेक्लेमेशन विभाग स्वयंसेवी संस्थेने जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेत म्हटले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या रेक्लेमेशन जागेवर खाजगी संस्थेकडून विकास करायला परवानगी दिली. ही जमीन हरित पट्ट्यात येत असून सीआरझेडच्या तरतूदींचे उल्लंघन होत असल्याचे म्हटले आहे. एमएसआरडीसीने अनेक महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांनी या आधीच अदानी समुहाला बांधकाम करण्याची परवानगी दिली असून विकास करारही करुन टाकला आहे.

## एल्वीश यादव खटला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

■ नवी दिल्ली

**रेव्ह** पार्ट्या आयोजित करून परदेशी लोकांना नशेसाठी सापाचे विष पुरवण्याचा आरोप असलेल्या युट्युबर एल्वीश यादव याच्याविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या खटल्याला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. याआधी अलाहाबाद उच्च न्यायालयाने या खटल्याला स्थगिती देण्यास नकार दिला होता. एल्वीश यादव या युट्युब इन्फ्ल्युएन्सर म्हणून प्रसिध्द आहे. आपल्या व्हिडिओमधून तो सापांचे प्रदर्शन करतो असाही त्याच्यावर आरोप आहे. उत्तर प्रदेश पोलिसांनी त्याच्याविरूद्ध सापाचे विष अंमली पदार्थ म्हणून वापरल्याचा आरोप ठेवला होता. त्याच्याविरूद्ध वन्य जीव संरक्षण कायदा आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. अलाहाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिलास देण्यास नकार दिल्याने एल्वीश यादवने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

## कुर्ल्यात लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू

**मुंबई -** कुर्ला रेल्वे स्थानकावर लोकलमधून पडून एका तरुणाचा मृत्यू झाला. दुपारी सुमारे तीन वाजताच्या सुमारास ही घटना प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वर घडली. पनवेलकडे जाणाऱ्या लोकलमधून तो तरुण अचानक खाली पडला आणि चालू लोकलखाली आल्याने त्याचा मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की त्याचे शीर धडापासून वेगळे झाले. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तपास सुरू केला. या दुर्घटनेमुळे प्रवाशांमध्ये खळबळ उडाली.

## दिल्लीत राहू देण्याची गौतम नवलखांची विनंती फेटाळली

■ मुंबई

**एल्गार** परिषद प्रकरणी अटक करण्यात आलेले आणि सध्या जामिनावर सुटलेले सामाजिक कार्यकर्ते गौतम नवलखा यांना दीड महिन्यांसाठी दिल्लीत येऊन राहण्याची परवानगी विशेष न्यायालयाने नाकारली .

नवलखा यांना डिसेंबर २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने काही अटींवर जामीन मंजूर केला आहे. त्यातील महत्वाची अट म्हणजे त्यांना विशेष न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय मुंबईबाहेर जाता येणार नाही .

या अटीमुळे नवलखा विशेष न्यायालयात वारंवार दिल्लीत येण्याची परवानगी मागत आहेत. मागील जून महिन्यातही त्यांनी अशाच प्रकारे दिल्लीत कायमस्वरुपी वास्तव्य करण्याची परवानगी देण्यासाठी अर्ज केला होता . ती विशेष न्यायालयाने फेटाळल्यानंतर आता दीड महिन्यांसाठी दिल्लीत वास्तव्य करण्याची परवानगी नवलखा यांनी मागितली होती. ती न्यायालयाने फेटाळली.

## दंगलीस सत्ताधारी जबाबदार शरद पवार गटाचा आरोप



■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात मागील आठवड्यात व्हॉट्सपवरील एका पोस्टवरून दोन गटांत तणाव निर्माण झाला होता. या दंगलीला सत्ताधारी भाजपा आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप जबाबदार आहेत, असा आरोप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते विकास लवांडे यांनी केला आहे. या प्रकरणी पोलीस महासंचालकांना पत्र लिहून संबंधित आमदारांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

विकास लवांडे पत्रात म्हणाले की, दौंड येथे काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. त्यानंतर ३१ जुलै रोजी यवत येथे आमदार गोपीचंद पडळकर, आमदार संग्राम जगताप, जय वैष्णव किन्नर आखाड्याच्या प्रमुख हेमांगी सखी यांच्यासह काही संघटनांनी पोलिसांची परवानगी नसताना हिंदू जनआक्रोश मोर्चा काढत जाहीर सभा घेतली. या सभेत धार्मिक तेढ निर्माण करणारी प्रक्षोभक भाषणे करण्यात आली. त्यामुळे १ ऑगस्ट रोजी यवत येथे हिंसाचार झाला. तीन-चार दिवसांपासून गावात तणावाचे वातावरण होते, याची माहिती पोलिसांना असूनही त्यांनी यावर नियंत्रण आणले नाही. पोलिसांनी राजकीय दवावाखाली येऊन अप्रत्यक्षपणे बेकायदा कृतीला प्रोत्साहन दिल्याचे स्पष्ट होत आहे.

## माझ्या रक्तामध्येच बंडखोरी मंत्री संजय शिरसाटांचे वक्तव्य

■ मुंबई

**माझ्या** रक्तात बंडखोरी आहे. कोणताही अन्याय आम्ही सहन करणार नाही, असे वक्तव्य आज सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले. चेंबूर येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एक हजार विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. वरळीतील जुने वसतिगृह पाडून एक हजार विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृह बांधण्याची घोषणादेखील शिरसाट यांनी यावेळी केली.

संजय शिरसाट म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आम्हाला सांगायचे की, तुम्ही रडू नका, त्यापेक्षा तुम्ही लढा. त्यामुळे आम्ही त्यांच्या शब्दांचे पालन करत आहोत. वाईट गोष्टीच्या विरोधात आम्ही बंडखोरी करणार. याचा कोणीही राजकीय अर्थ काढू नका. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर राजकीय कारणासाठी गेले आहेत. उद्धव ठाकरे दिल्ली दौरा सोनिया गांधी यांच्या वाढदिवसाचा केक कापण्यासाठी करतात. राहुल गांधीची गळाभेट घेण्यासाठी काश्मीरमध्ये जातात. तेते निधी मागण्यासाठी जातात का? एकनाथ शिंदेंमुळे सरकारी कामांना गती आली आहे. यांच्यासारखे घरी बसून सरकार चालवता येत नाही.



**नारळीपौर्णिमेचा सण जवळ आल्याने वरळीचे कोळीबांधव आपल्या बोटींना रंगरंगोटी करत आहेत. नारळीपौर्णिमेनंतर मासेमारीला सुरुवात होते.** (छाया: दीपक साळवी)

## गंगा पायाशी आली! उत्तर प्रदेश मंत्र्यांकडून पूरग्रस्तांची थट्टा

■ लखनौ

उत्तर प्रदेशात सध्या गंगा नदीला सध्या पूर आला आहे. या पूरग्रस्त गावांचा दौरा करताना उत्तर प्रदेशचे कॅबिनेट मंत्री संजय निषाद यांनी गंगा तुमच्या पायाशी आली असून आता तुम्ही स्वर्गात जाणार असल्याचे अजब वक्तव्य केल्यानंतर लोकांना डोक्यावर हात मारून घ्यावा लागला.

गेल्या चार दिवसापासून गंगेला आलेल्या पूराने किनाऱ्यालगतची अनेक गावे पाण्याने वेढली आहेत. उत्तर प्रदेशचे कॅबिनेट मंत्री संजय निषाद हे कानपूर ग्रामीण भागात पूरग्रस्तांची विचारपूस करण्यासाठी गेले होते. यावेळी ते ग्रामस्थांना म्हणाले की, तुम्ही गंगेची मुले आहेत. गंगा नदी तुमचे पाय धुण्यासाठी तुमच्या दारापर्यंत आली आहे. त्यामुळे तुम्ही आता थेट स्वर्गात जाणार आहात. यावेळी एका वृद्ध महिलेने त्यांना तुम्हीही आमच्याबरोबर इथे राहून गंगेचे आशीर्वाद घ्यावेत असा सल्ला दिला. यावर भरीस भर म्हणून मंत्र्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की मी केवळ पूरग्रस्तांना भावनिक पाठिंबा देण्यासाठी असे बोललो होतो.

## पुण्याच्या महापालिका आयुक्तांच्या बंगल्यातून महागड्या वस्तू गायब

■ पुणे

**पुणे** महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या चित्तरंजन वाटिकेजवळील मॉडेल कॉलनीतील बंगल्यातून लाखोंच्या महागड्या वस्तू गायब झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

आयुक्तांचा तब्बल दीड एकरमध्ये असलेला बंगला सीसीटीव्ही आणि २४ तास सुरक्षारक्षकांच्या देखरेखीखाली असतो. या परिसरात काही आमदार आणि उद्योजक वास्तव्यास असल्यामुळे पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असतो. तरीही या बंगल्यातून चार एसी, झुंबर, ऐतिहासिक चित्रे, पितळी दिवे, दोन एलईडी टीव्ही, कॉफी मेकर, वॉकीटॉकी सेट, चिमणीसह किचन टॉप, वॉटर प्युरिफायर यांसह अनेक महत्त्वाच्या वस्तू गायब झाल्या आहेत. नवल किशोर राम यांनी महापालिका आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतल्याला दोन महिने होत आले आहेत. त्याआधी डॉ. राजेंद्र भोसले या बंगल्यात वास्तव्यास होते. भोसले यांच्या बदलीनंतर नवल किशोर राम यांना बंगला हस्तांतरित करताना संबंधित खात्यांनी घराची पाहणी केली, त्यावेळीच या वस्तू गायब असल्याचे लक्षात आले. यानंतर काही आवश्यक वस्तू महापालिकेने तातडीने खरेदी करून पूर्तता केली. मात्र उर्वरित वस्तूंसाठी सुमारे २० लाख रुपयांची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबत नवल किशोर राम म्हणाले की,या बंगल्याची जबाबदारी भवन विभागाची आहे.त्यामुळे येथील साहित्य कुठे गेले हे पाहणे त्यांचे काम आहे. त्यामुळे याबाबत संबधित अधिकार्याची चौकशी केली जाईल.

## छत्तीसगडच्या बीजापूरमध्ये चकमकीत नक्षलवादी ठार

■ रांची

छत्तीसगडच्या बीजापूर जिल्ह्यातील गंगालूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या जंगलात आज सुरक्षादलाशी झालेल्या चकमकीत एक नक्षलवादी ठार झाला. त्याच्याकडून शस्त्रसाठाही जप्त करण्यात आला.

गंगालूरच्या जंगलात नक्षलवादी लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी इतर सुरक्षा दलांच्या मदतीने संयुक्त कारवाई सुरु केली. नक्षलवाद्यांनी पोलिसांवर गोळीबार सुरु केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा दलाने केलेल्या गोळीबारात एक नक्षलवादी ठार झाला. पोलिसांनी त्याचा मृतदेह ताब्यात घेतला असून त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही सापडला आहे.

## सायबर गुन्हे प्रकरणी ईडीच्या दिल्लीत धाडी

■ नवी दिल्ली

**सर्वसामान्य** लोकांना डिजीटल अरेस्टची भीती दाखवत त्यांच्याकडून घेतलेली रक्कम क्रिप्टो करन्सीत गुंतवणूक करून केलेल्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी आज सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने दिल्लीसह इतर ११ शहरांमध्ये धाडी टाकल्या. या प्रकरणातील आरोपी चिराग थोमर याला अमेरिकेत अटक झाल्यानंतर आज त्याच्याशी संबंधित ठिकाणांवर या धाडी टाकण्यात आल्या.

डिजिटल अरेस्टची भिती दाखवून अनेकांची आर्थिक फसवणूक झाल्याचे उघडकीस आले होते. त्यातून मिळवलेले तब्बल ४२ कोटी रुपये कॉईनबेस या संकेतस्थळाच्या माध्यमातून क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवण्यात

**४२ कोटींची फसवणूक**

आले. यात एका व्यक्तीने २० कोटी अमेरिकन डॉलर्सची रक्कम गुंतवली. या प्रकरणाशी संबंधित चिराग थोमर याला अमेरिकेत अटक करण्यात आली. त्यानंतर ईडीने त्याच्याशी संबंधित लोकांच्या विविध कार्यालये व घरांवर धाडी टाकल्या. दुसऱ्या एका प्रकरणात क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून तब्बल ३८४ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका २८ वर्षीय तरुणाला बंगळुरु पोलिसांनी अटक केली आहे. नेबिलो टेक्नालॉजी या सरकारला सेवा देणाऱ्या कंपनीचे उपाध्यक्ष हरदीप सिंग यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. एका हॅकरने या कंपनीच्या क्रिप्टोकरन्सी वॉलेटमधील पैसे दुसऱ्या एका अज्ञात खात्यात वळवल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणी कंपनीचा एक कर्मचारी राहुल अग्रवाल याला अटक करण्यात आल्याची माहिती बंगळुरु पोलिसांनी दिली आहे.

## कर्नाटकच्या मठातील महंत मुसलमान निघाला

■ बंगळुरु

**कर्नाटकच्या** चामराजनगरमधील लिंगायत समाजाच्या मठात काही दिवसांपूर्वी नेमण्यात आलेला महंत प्रत्यक्षात मुस्लीमधर्मीय असल्याचे उघड झाले आणि एकच गदारोळ माजला. संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी त्या महंताला मठातून हाकलून दिले.

निजलिंग स्वामी असे नाव धारण केलेला हा २२ वर्षीय तरूण मुस्लीम कुटुंबात जन्मला होता. त्याचे नाव महंमद निसार आहे. पण त्याला लहानपणापासून लिंगायतांचे गुरु बसवण्णा यांच्याबद्दल ओढ निर्माण झाली होती. त्याच्या माता-पित्यांना त्याचे लिंगायत समाजाचे अनुकरण करणे आवडत नव्हते. म्हणून त्यांनी त्याला मदरशामध्ये मुस्लीम धार्मिक शिक्षण घेण्यासाठी पाठवले होते. पण निसारने वयाच्या १७ व्या दीक्षा घेतली, तेव्हापासून तो बसवण्णा यांच्या विचारांचा प्रसार करू लागला होता.

चामराजनगरच्या चौडाहल्ली येथे गुरुमल्लेश्वर शाखा मठाची स्थापना झाल्यानंतर त्याला महंत नेमण्यात आले. या मठात तो महंत म्हणून काम करत असता एके दिवशी एका ग्रामस्थाने त्याचा मोबाईल फोन सहज तपासला असता त्याच्या आधारकार्डचा फोटो आढळला. त्यात त्याचे नाव महंमद निसार असल्याचे कळताच ग्रामस्थाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने हे वृत्त इतरांना सांगितले. नियलिंग स्वामी म्हणून मठात महंत म्हणून वावरणारा हा माणूस मुसलमान आहे हे कळताच ग्रामस्थ संतापले आणि त्याला तातडीने मठातून हाकलण्यात आले.

## खेवलकर यांच्या अडचणीत वाढ आता मानवी तस्करीची तक्रार

■ पुणे

**पुण्यातील** रेव्ह पार्टी प्रकरणात शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल मनीष खेवलकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्यातील प्रज्ञा खोसरे यांच्या सानवी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेने राज्य महिला आयोगाकडे खेवलकरांविरोधात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत त्यांच्यावर मानवी तस्करीचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या तक्रारीची दखल घेत राज्य महिला आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांना तपास अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.



सानवी संस्थेच्या तक्रारीनुसार, प्रांजल खेवलकर यांनी खराडी येथील स्टेबर्ड हॉटेलमध्ये २८ वेळा रूम बुक केल्या होत्या. या बुकिंगदरम्यान अनेकवेळा परप्रांतीय मुलींना आमिष दाखवून आणल्याचा दावा संस्थेने केला आहे. त्यामुळे हे केवळ रेव्ह पार्टीपुरते मर्यादित न राहता, यात मानवी तस्करी रॅकेटचा संशय आहे. या तक्रारीची दखल घेत राज्य महिला आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांना पत्र लिहून मानवी तस्करीविरोधी पथक आणि सायबर सेलमार्फत सखोल चौकशी करून तपासाचा अहवाल आयोगाकडे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## कोल्हापुरीने तोंड फोडणार हिंदुस्थानी भाऊला धमकी

■ कोल्हापूर

**कोल्हापुरी** चप्पलने तोंड फोडणार, अशी धमकी वजा इशारा शिवसेनेचे (ठाकरे गट) कार्यकर्ते प्रशांत भिसे यांनी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर हिंदुस्थानी भाऊ उर्फ विकास पाठक याला दिली आहे. महादेवी उर्फ माधुरी या हत्तीणीच्या वादामध्ये हिंदुस्थानी भाऊने काल उडी घेत कोल्हापूरकारांविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारा व्हिडीओ पोस्ट केला होता.

हा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर प्रशांत भिसे यांनी हिंदुस्तानी भाऊला सडेतोड उत्तर दिले. त्यांनी आपला एक व्हिडीओ पोस्ट करत म्हटले की, 'हिंदुस्थानी भाऊ उर्फ विकास पाठक तुला एकच गोष्ट सांगतो. तू कोल्हापूरकरांना शिव्या द्यायच्या भानगडीत पडू नको.

कोल्हापूरचे प्रोडक्ट माहिती आहे का तुला? कोल्हापुरी चप्पल. या चप्पलेने तुझे तोंड फोडणार म्हणजे फोडणारच हे लक्षात ठेव. मराठी माणसाच्या नादी लागू नको. '